दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द
संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक ३२० । गुरुवार ३ सप्टेंबर २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

## चार विद्यार्थ्यांचा जात वैधता दावा अवैध
### वैजापुरात मराठा आरक्षणाचा मुद्दा पुन्हा पेटणार

**वैजापूर :** गेल्या आठ महिन्यांपासून जात वैधता प्रमाणपत्राची प्रतीक्षा करणाऱ्या चार विद्यार्थ्यांच्या जात दाव्याबाबत जात पडताळणी समितीने प्रतिकूल निर्णय दिल्याने वैजापुरात खळबळ उडाली आहे. खुशी सोनवणे, सृष्टी सोनवणे, सार्थक सोनवणे आणि शीतल सोनवणे यांचे जात दावे अवैध ठरविण्यात आल्याने त्यांच्या शैक्षणिक भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे, शिंदे समितीच्या नोंदीमध्ये उपलब्ध असलेले प्रमाणपत्रही जात पडताळणी समितीने ग्राह्य धरले नसल्याचा दावा सोनवणे कुटुंबीयांनी केला आहे. जात वैधतेसाठी आठ महिन्यांपासून शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवूनही प्रश्न सुटला नसल्याने कुटुंबीयांमध्ये तीव्र नाराजी आहे. काही दिवसांपूर्वी या प्रश्नासाठी सोनवणे कुटुंबातील एका सदस्याने वैजापूर नगरपरिषदेच्या पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन केले होते. त्यावेळी मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनीही फोनवरून संपर्क साधून आंदोलनकर्त्याला खाली उतरण्याचे आवाहन केले होते.

# मराठा समाजाला ओबीसींच्या सर्व सवलती!

## जरांगे उपोषणावर ठाम : जीआर हातात मिळाल्याशिवाय उठणार नाही

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जालना :** मराठा आरक्षण आणि कुणबी जात प्रमाणपत्राच्या मुद्द्यावर अंतरवाली सराटीत आमरण उपोषणाला बसलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्याशी सरकारच्या चर्चेला वेग आला असून, शासनाच्या वतीने मराठा समाजासाठी महत्त्वाच्या पाच घोषणा करण्यात आल्या आहेत. ओबीसी समाजाला मिळणाऱ्या सवलती मराठा सम ाजालाही देण्याचा दावा, हैदराबाद गॅझेटनुसार कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया, सारथीला अधिक सक्षम करण्याचे आश्वासन, मंत्रालयात स्वतंत्र मराठा कक्षासाठी कार्यालय आणि ५८ लाख कुणबी नोंदींवर कार्यवाही, अशी आश्वासने सरकारकडून देण्यात आली आहेत.



मराठा समाजाच्या सर्व मागण्या या मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या म्हणजे १७ सप्टेंबरच्या आधी पूर्ण करू, मराठ्यांना ओबीसींच्या सर्व सवलती देऊ, असा मोठा शब्द राज्य सरकारचे प्रतिनिधी म्हणून आमदार प्रसाद लाड यांनी मनोज जरांगे यांना दिला.

मात्र, सरकारच्या या घोषणांनंतरही मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घेण्यास स्पष्ट नकार दिला आहे. जोपर्यंत शासन निर्णय हातात येत नाही, तोपर्यंत उपोषण सोडणार नाही, अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली आहे.

उपोषणाचा आज पाचवा दिवस असून, जरांगे यांच्या प्रकृतीबाबत चिंता व्यक्त केली जात असतानाच सरकारच्या वतीने चर्चेचे प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि उदय सामंत यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेत मराठा आरक्षण आणि कुणबी प्रमाणपत्राच्या मुद्द्यावर शासनाची भूमिका स्पष्ट केली.

जरांगे पाटील यांच्या प्रमुख मागण्यांपैकी एक असलेल्या हैदराबाद गॅझेटनुसार कुणबी प्रमाणपत्र देण्याबाबत सरकारने सकारात्मक भूमिका घेतल्याचा दावा करण्यात आला आहे. मराठवाड्यातील ५८ लाख कुणबी नोंदींच्या आधारे पात्र नागरिकांना प्रमाणपत्र देण्यासाठी कार्यवाही सुरू असल्याचे मंत्र्यांनी सांगितले.

सरकारच्या माहितीनुसार, हैदराबाद गॅझेटनुसार कार्यवाही सुरू असून आतापर्यंत हजारो अर्जांवर प्रक्रिया करण्यात आली आहे. १० ते १७ सप्टेंबरदरम्यान प्रत्येक मंडळात विशेष शिबिरे घेऊन अर्जदारांना प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले.

शिंदे समिती स्थापन झाल्यानंतर मोठ्या प्रमाणावर कुणबी प्रमाणपत्रांची प्रक्रिया सुरू झाली असून, मराठा समाजाला न्याय देण्यासाठी शासनाने पावले उचलल्याचा दावा मंत्री विखे पाटील यांनी केला. सरकारच्या आश्वासनानंतरही जरांगे पाटील यांनी भूमिका बदललेली नाही. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, हैदराबाद गॅझेटनुसार प्रमाणपत्र वाटपाची प्रत्यक्ष सुरुवात आणि शासन निर्णय हातात मिळाल्याशिवाय उपोषण मागे घेतले जाणार नाही.

आता पाणी पितोय, सलाईन लावतोय; पण उपोषण सोडणार नाही. सातारा आणि कोल्हापूर गॅझेटबाबत सरकारला दोन दिवसांचा वेळ देतो, अशी भूमिका जरांगे यांनी घेतल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, भाजप नेते प्रसाद **(पान ४ वर)**

### सरकारच्या पाच मोठ्या घोषणा

- **ओबीसींच्या सवलती मराठा समाजालाही**
**ओबीसी विद्यार्थ्यांना आणि समाजाला मिळणाऱ्या विविध शैक्षणिक व इतर सवलती मराठा समाजालाही मिळतील, असा दावा सरकारकडून करण्यात आला.**
- **हैदराबाद गॅझेटनुसार कुणबी प्रमाणपत्र**
**मराठवाड्यातील पात्र नागरिकांना हैदराबाद गॅझेटच्या नोंदींनुसार कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.**
- **५८ लाख कुणबी नोंदींवर कार्यवाही**
**मराठवाड्यातील तब्बल ५८ लाख कुणबी नोंदींच्या आधारे अर्जदारांच्या प्रकरणांवर कार्यवाही करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.**
- **'सारथी'ला अधिक सक्षम करणार**
**बार्टी आणि महाज्योतीप्रमाणेच मराठा समाजासाठी कार्यरत असलेल्या सारथी संस्थेला अधिक सक्षम करून सुविधा वाढविण्यात येणार असल्याचे आश्वासन देण्यात आले.**
- **मंत्रालयात स्वतंत्र मराठा कक्ष**
**मराठा समाजाच्या प्रश्नांसाठी मंत्रालयात स्वतंत्र मराठा कक्षाला कार्यालय देऊन त्याच्या कामकाजाला गती देण्याची घोषणा करण्यात आली.**

# मराठा आरक्षणासाठी महाराष्ट्र पेटला!

## जालना, बीडसह आज ४ जिल्हे कडकडीत बंद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जालना :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलक मनोज जरांगे पाटील मागील ५ दिवसांपासून जालन्यातील अंतरवली सराटी येथे आमरण उपोषणाला बसले आहेत. मागील दोन दिवसांपासून त्यांची प्रकृती खालावत चालल्याने राज्यभरातील मराठा समाज अत्यंत आक्रमक झाला आहे. सरकारच्या शिष्टमंडळासोबत अद्याप कोणताही तोडगा न निघाल्याने संतापाची लाट पसरली आहे.

मनोज जरांगे यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी उद्या, गुरुवारी (३ सप्टेंबर) मराठा समाजाच्या वतीने जालना, बीड, परभणी आणि लातूर या ४ जिल्ह्यांमध्ये कडकडीत बंदचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच तोडगा न निघाल्यास धाराशिव जिल्हाही बंद करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

### अनेक जिल्ह्यांत रस्ता रोको

बुधवारी मराठा समाजाच्या वतीने राज्यातील विविध भागांत आंदोलन करण्यात आले. संभाजीनगर, परभणी, जालना, धाराशिव, बीड आणि लातूरसह अनेक ठिकाणी आंदोलकांनी रस्त्यावर उतरून रस्ता रोको केला. त्यामुळे काही ठिकाणी वाहतुकीवर परिणाम झाला असून प्रशासन आणि पोलिसांकडून परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत आहे.

सरकारने आजच ठोस तोडगा काढला नाही, तर संपूर्ण महाराष्ट्रात आणखी तीव्र आणि आक्रमक आंदोलन उभारण्याचा इशारा मराठा समाजाने दिला आहे. आज अनेक ठिकाणी रस्ता रोको करण्यात आला आहे. संभाजीनगर, परभणी, जालना, धाराशिव, बीड, लातूरसह अनेक ठिकाणी मराठा समाज रस्त्यावर उतरला. सरकारकडून तोडगा काढण्याचे प्रयत्न केले जात आहेत.

चारही जिल्ह्यांतील सर्व बाजार समित्यांमधील व्यवहार पूर्णपणे ठप्प राहतील. व्यापारी संघटनांनी बंदला पाठिंबा दिल्यास सर्व किरकोळ व ठोक दुकाने बंद राहतील. प्रमुख महामार्ग **(पान ४ वर)**



### आवाज वाढवू नका, चर्चा करतोय ना...

मराठा आरक्षण उपसमितीचे प्रमुख तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे मराठा समाजाच्या आंदोलकांशी चर्चा करत होते, त्याचवेळी तिथे एक कार्यकर्ता आला. आमचं काळीज उपोषणाला बसलं आहे, काहीतरी करा, अशी विनंती केली, पण आवाज वाढवू नका, चर्चा करतोय ना, असं म्हणज विखे पाटील संतापले आणि तिथून निघून गेले. विखे पाटील यांच्यासोबत असलेल्या कर्मचाऱ्यांनी मराठा आंदोलकांची समजूत घातली. हा प्रकार घडल्यानंतरही मंत्री विखे पाटील यांनी दोन्ही मराठा समाज बांधवांना बोलावलं आणि त्यांच्यासोबत बसून चर्चा केली.

## 'जात पंचायतीचा पंच आहे... पाच लाख दे!'

### पैशांच्या मागणीला नकार देताच कुटुंबावर लोखंडी गज-दांडक्याने हल्ला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड / प्रतिनिधी :** घरासमोर सकाळची नेहमीची लगबग सुरू असताना अचानक सहा जणांचा जमाव आला... 'मी जात पंचायतीचा पंच आहे, तुमच्या मुलीच्या लग्नाचे पाच लाख रुपये द्यावे लागतील,' अशी मागणी करण्यात आली.



पैशांना नकार देताच वाद वाढला आणि क्षणार्धात लोखंडी गज, लाकडी दांडके आणि लाथाबुक्क्यांचा मारा सुरू झाला! जामखेड शहरातील आराळे वस्ती येथे घडलेल्या या धक्कादायक घटनेने खळबळ उडाली आहे. या हल्ल्यात एकाच कुटुंबातील चार जण जखमी झाले असून, बाबू तात्या शिंदे आणि त्यांचा पुतण्या सागर बापू शिंदे या दोघांवर अहिल्यानगर येथील जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी सहा जणांविरुद्ध जामखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**(पान ४ वर)**

# ओबीसींचा 'महाएल्गार' थांबला; पण संघर्ष कायम!

## मुख्यमंत्र्यांसोबत बैठकीच्या आश्वासनानंतर लक्ष्मण हाके यांचा 'चलो मुंबई' मोर्चा तात्पुरता स्थगित

### तोडगा निघाला नाही तर पुन्हा रस्त्यावर उतरण्याचा इशारा; 'आम्हाला केवळ ४ टक्के यश' ` हाकेंची कबुली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई / प्रतिनिधी :** मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी म नोज जरांगे पाटील यांचे अंतरवाली सराटीत आंदोलन सुरू असतानाच, ओबीसी आरक्षणाच्या संरक्षणासाठी ओबीसी संघटनांनीही आक्रमक पवित्रा घेतला आहे. ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके यांच्या नेतृत्वाखाली मुंबईकडे निघालेला 'ओबीसी महाएल्गार मोर्चा' अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठकीचे आश्वासन मिळाल्यानंतर तात्पुरता स्थगित करण्यात आला. मात्र, बैठकीत ओबीसी समाजाच्या मागण्यांवर समाधानकारक तोडगा न



निघाल्यास पुन्हा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा हाके यांनी दिला आहे.

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या कुणबी दाखल्यांच्या मागणीमुळे ओबीसी आरक्षणावर परिणाम होण्याची भीती व्यक्त करत हाके यांच्या नेतृत्वाखाली हा महाएल्गार उभारण्यात आला होता. मुंबईकडे निघालेल्या मोर्चाला काही ठिकाणी पोलिसांनी परवानगी नाकारली, तर काही ठिकाणी मोर्चा रोखण्याचाही प्रयत्न करण्यात आला. तरीही आंदोलनकर्त्यांनी मुंबईकडे कूच करण्याची **(पान ४ वर)**

### 'हाकेंसोबत शेवटपर्यंत राहणार' – कटके

दरम्यान, ओबीसी नेते बळीराम कटके यांनी प्रा. लक्ष्मण हाके यांना जाहीर पाठिंबा देत, इतर नेते सोबत आले किंवा नाही आले तरी आपण शेवटपर्यंत हाके यांच्या पाठीशी राहणार असल्याची भूमिका घेतली. दीड-दोन वर्षांपूर्वी वडीगोद्री येथील हाके यांच्या आंदोलनातही आपण सक्रिय सहभाग घेतल्याचे त्यांनी सांगितले. हाके यांच्या आंदोलनावर टीका करणाऱ्या नवनाथ वाघमारे यांचाही कटके यांनी समाचार घेतला. सरकारने ओबीसी आंदोलनकर्त्यांना आझाद मैदानावर आंदोलन करू दिले नाही, तर थेट मुख्यमंत्री निवासस्थान 'वर्षा' येथे जाऊन आंदोलन करण्याचा इशाराही कटके यांनी दिला.

### बैठकीत तोडगा नाही तर पुन्हा आंदोलन

मुख्यमंत्र्यांसोबतच्या प्रस्तावित चर्चेनंतरही ओबीसी आरक्षणाच्या संरक्षणाबाबत ठोस निर्णय झाला नाही, तर 'चलो मुंबई' आंदोलनापेक्षाही तीव्र लढा उभारण्याचे संकेत लक्ष्मण हाके यांनी दिले आहेत.

# वाळू माफियांच्या मुसक्या आवळल्या!

### श्रीरामपूर-राहाता तालुक्यात स्थानिक गुन्हे शाखेचे छापे; २० लाख ३० हजारांचा मुद्देमाल जप्त

## चार आरोपींविरुद्ध पाच गुन्हे; दोघेफरार



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत श्रीरामपूर आणि राहाता तालुक्यातील वाळू माफियांच्या मुसक्या आवळल्या आहेत. दोन्ही तालुक्यांत दोन ठिकाणी छापे टाकून चार आरोपींविरुद्ध पाच गुन्हे दाखल करण्यात आले असून, या कारवाईत २० लाख ३० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील अवैध वाळू वाहतुकीविरोधात कठोर कारवाईचे आदेश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तयार करण्यात आले होते.

या पथकात पोलीस अंमलदार गणेश लोंढे, निळकंठ कारखेले, रणजीत जाधव, बाळासाहेब गुंजाळ आणि सतीष भवर यांचा समावेश होता. पथकाने १ सप्टेंबर रोजी श्रीरामपूर तालुका आणि राहाता पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध वाळू वाहतुकीची माहिती घेत दोन ठिकाणी छापे टाकले.

श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यात ५ लाख **(पान ४ वर)**

# साखरेची साठा मर्यादा थेट निम्म्यावर!



## ४ हजारांऐवजी आता केवळ २ हजार क्विंटल साखर ठेवता येणार

- **१५ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबरपर्यंत नवे निर्बंध**
- **अतिरिक्त साठा बाजारात येणार**
- **सणासुदीपूर्वी भाव कमी होण्याची शक्यता**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली / प्रतिनिधी :** आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्यांना महागाईचा फटका बसू नये आणि बाजारातील साखरेची साठेबाजी व सट्टेबाजी रोखण्यासाठी केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. केंद्रीय अन्न व सार्वजनिक वितरण मंत्रालयाने व्यापारी आणि घाऊक विक्रेत्यांसाठी साखरेच्या कमाल साठा मर्यादेत थेट निम्म्याने कपात केली आहे. यापुढे ४ हजार क्विंटलऐवजी केवळ २ हजार क्विंटल साखरेचा साठा ठेवण्यास परवानगी असेल.

१५ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत हा निर्णय लागू राहणार आहे. सरकारच्या या कठोर निर्णयामुळे मोठ्या प्रमाणावर साखर साठवून कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्या व्यापाऱ्यांना मोठा धक्का बसला असून, बाजारातील वाढलेल्या साखरेच्या दरांना वेसण बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

केंद्रीय अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाने जारी केलेल्या आदेशानुसार, नवीन साठा मर्यादेपेक्षा जास्त साखर असलेल्या व्यापाऱ्यांना त्यांचा अतिरिक्त साठा बाजारात आणावा लागणार आहे. त्यामुळे खुल्या बाजारात साखरेचा पुरवठा वाढून दरांवरील दबाव कमी होईल, असा सरकारचा अंदाज आहे.

**सणासुदीच्या काळात मिठाई, प्रसाद आणि विविध खाद्यपदार्थांमुळे साखरेची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. त्यामुळे याच काळात दरवाढ रोखणे हे सरकारसमोरील मोठे आव्हान होते. ऐन सणासुदीच्या तोंडावर केंद्राने घेतलेल्या या निर्णयामुळे साखरेची साठेबाजी करणाऱ्यांचे धाबे दणाणले असून, बाजारात पुरवठा सुरळीत झाल्यास महागाईने होरपळणाऱ्या सर्वसामान्य जनतेला मोठा दिलासा मिळू शकतो.केंद्राचा हा निर्णय प्रत्यक्षात बाजारातील साखरेचे भाव किती खाली आणतो, याकडे आता गृहिणींसह व्यापारी आणि मिठाई उद्योगाचे लक्ष लागले आहे.**

गेल्या काही दिवसांपासून सण-उत्सवांचे दिवस जवळ येत असतानाच साखरेच्या दरांमध्ये वाढ होत होती. ऐन मागणीच्या काळात मोठ्या प्रमाणावर साखर साठवून कृत्रिम टंचाई निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याची चर्चा बाजारात सुरू होती. परिणामी, चढ्या दराने साखरेची विक्री होण्याची भीती निर्माण झाली होती. साखरेबरोबरच खाद्यतेल आणि दुधाच्या दरातही सातत्याने वाढ होत असल्याने सर्वसामान्य नागरिकांचे घरगुती बजेट बिघडले आहे. साखरेच्या वाढत्या दरांचा फटका केवळ गृहिणींनाच नव्हे, तर मिठाई उत्पादक, हॉटेल व्यावसायिक आणि खाद्यपदार्थ उद्योगालाही बसत आहे.केंद्राच्या निर्णयानंतर आता २ हजार क्विंटलपेक्षा जास्त साखर साठवून ठेवणाऱ्या घाऊक व्यापाऱ्यांना अतिरिक्त साठा विक्रीसाठी खुल्या बाजारात आणावा लागणार आहे. त्यामुळे बाजारातील साखरेचा पुरवठा वाढण्याची शक्यता असून, किरकोळ बाजारातील दर कमी होण्यास मदत होईल.

सरकारने नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कडक कारवाईचा इशाराही दिला आहे. साठेबाजी करून कृत्रिम तुटवडा निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर प्रशासनाची करडी नजर राहणार असल्याचे संकेत देण्यात आले आहेत.व्यापारी आणि घाऊक विक्रेत्यांसाठी साखरेची साठा मर्यादा निम्म्यावर आणल्याने साठेबाजांना मोठा झटका बसला आहे. अतिरिक्त साठा बाजारात आल्यास सणासुदीच्या काळात साखरेच्या भाववाढीला लगाम बसण्याची शक्यता आहे.

# केवळ घोषणा नको, विश्वासाचा 'जीआर' द्या!

महाराष्ट्राच्या राजकारणात आणि समाजकारणात आज आरक्षणाचा प्रश्न पुन्हा एकदा धगधगत आहे. अंतरवाली सराटीत मनोज जरांगे पाटील उपोषणाच्या माध्यमातून सरकारला जाब विचारत आहेत; दुसऱ्या बाजूला ओबीसी समाज आपल्या आरक्षणाच्या संरक्षणासाठी रस्त्यावर उतरला आहे; तर वैजापूरमध्ये जात प्रमाणपत्राच्या नोंदी असूनही चार विद्यार्थ्यांचे जात दावे अवैध ठरल्याची घटना प्रशासनाच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उभे करीत आहे. एका बाजूला सरकारच्या घोषणा आणि दुसऱ्या बाजूला सामान्य कुटुंबांचा प्रत्यक्ष अनुभव, या दोन वास्तवांमधील दरी आज महाराष्ट्राच्या सामाजिक वातावरणाला अधिक अस्वस्थ करीत आहे.

ही केवळ मराठा आरक्षणाची लढाई राहिलेली नाही आणि हा केवळ ओबीसी आरक्षणाचा प्रश्नही नाही. हा प्रश्न आहे शासनाच्या शब्दावर विश्वास ठेवायचा की नाही, याचा. आंदोलनकर्त्यांना आश्वासने मिळत आहेत; पत्रकार परिषदांमधून मोठमोठे निर्णय जाहीर होत आहेत; समित्या, नोंदी आणि आकडेवारी पुढे येत आहे. पण त्याचवेळी जात वैधतेसाठी आठ-आठ महिने शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवणाऱ्या विद्यार्थ्यांना नकार मिळत असेल, तर सरकारच्या घोषणांचा प्रत्यक्ष लाभ नेमका कुणापर्यंत पोहोचत आहे, हा प्रश्न विचारावाच लागेल.

आजची परिस्थिती सरकारसाठी केवळ राजकीय कसोटी नाही, तर सामाजिक विश्वासाची अग्निपरीक्षा आहे. मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन, ओबीसींचे प्रति आंदोलन आणि जात वैधतेच्या प्रक्रियेत समोर येत असलेले विरोधाभास, या तिन्ही घटनांचा अर्थ एकच आहे : महाराष्ट्राला आता आश्वासनांची नव्हे, तर स्पष्ट, लेखी आणि प्रत्यक्षात उतरलेल्या निर्णयांची गरज आहे.

सरकारच्या वतीने उद्योगमंत्री उदय सामंत आणि मराठा आरक्षण विषयक मंत्रिमंडळ उपसमितीचे प्रमुख तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पत्रकार परिषद घेऊन सरकारची भूमिका स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. हैदराबाद गॅझेटनुसार कुणबी प्रमाणपत्रांबाबत कार्यवाही, मराठवाड्यातील ५८ लाख नोंदी, विशेष शिबिरे, प्रत्येक जिल्ह्यात नोडल अधिकारी, स्वतंत्र मराठा कक्ष, सारथी संस्थेला अधिक सक्षम करण्याची भूमिका, मराठा विद्यार्थ्यांसाठी विविध सवलती आणि आंदोलनातील गुन्हे मागे घेण्याची प्रक्रिया, सरकारने मांडलेल्या या बाबी निश्चितच महत्त्वाच्या आहेत.

परंतु प्रश्न असा आहे की, घोषणा आणि शासन निर्णय यामध्ये अडकलेल्या सामान्य मराठा कुटुंबाला प्रत्यक्ष न्याय कधी मिळणार? मनोज जरांगे पाटील यांची भूमिका याच कारणामुळे महत्त्वाची ठरते. ते सरकारच्या तोंडी आश्वासनांवर समाधानी न होता लेखी शासन निर्णयाची मागणी करीत आहेत. जीआर हातात मिळाल्याशिवाय उपोषण सोडणार नाही, ही त्यांची भूमिका केवळ आंदोलनातील दबावतंत्र म्हणून पाहता नाही. कारण मराठा आरक्ष... प्रश्नावर गेल्या अनेक व... असंख्य बैठका, समित्य... आयोग, घोषणा आणि... आश्वासने झाली आहेत. पण प्रत्यक्ष लाभाच्या टप्प्यावर हजारो कुटुंबांना आजही कार्यालयांचे उंबरठे झिजवा... लागत आहेत. त्यामु... आता शब्दांपेक्षा लिखित आणि अंमलबजावणीयोग्य निर्णयाची मागणी होणे स्वाभाविक आहे.




सरकारने हैदराबाद गॅझेटनुसार प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगितले आहे. ५८ लाख नोंदींच्या आधारे पात्र व्यक्तींना न्याय देण्याची भूमिकाही स्पष्ट केली आहे. परंतु याच वेळी वैजापूरमधील सोनवणे कुटुंबातील चार विद्यार्थ्यांचे जात दावे अवैध ठरल्याची घटना समोर येते. आठ महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर मिळालेल्या या धक्क्यामुळे सरकारच्या मोठ्या आकडेवारीची आणि प्रत्यक्ष प्रशासकीय प्रक्रियेची सांगड घालण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

एकीकडे लाखो कुणबी नोंदी उपलब्ध असल्याचे सांगितले जाते, तर दुसरीकडे त्या नोंदींच्या आधारे प्रत्यक्ष विद्यार्थ्याला जात वैधता मिळत नसेल, तर प्रशासनाच्या विविध यंत्रणांमध्ये समन्वयाचा अभाव आहे का, हा प्रश्न गंभीर आहे. जात प्रमाणपत्र देणारी यंत्रणा आणि जात वैधता तपासणारी समिती यांच्या निकषांमध्ये स्पष्टता आणि एकरूपता नसेल, तर त्याचा सर्वांत मोठा फटका सर्वसामान्य विद्यार्थ्यांना बसणार आहे.

जात प्रमाणपत्र आणि जात वैधता या कायदेशीरदृष्ट्या स्वतंत्र प्रक्रिया असल्या तरी सामान्य नागरिकासाठी त्यांचा अर्थ एकच आहे‌शिक्षण आणि रोजगाराची संधी. एखाद्या विद्यार्थ्याचे प्रमाणपत्र अस्तित्वात आहे; नोंदी उपलब्ध आहेत; अर्ज केला आहे; तरीही वैधता न मिळाल्यामुळे त्याचा प्रवेश, शिष्यवृत्ती किंवा नोकरीचा हक्क धोक्यात येत असेल, तर सरकारी घोषणा त्या विद्यार्थ्यासाठी निरर्थक ठरतात. त्यामुळे सरकारने केवळ लाखो नोंदींची आकडेवारी सांगण्यापेक्षा प्रत्येक अर्जदाराला न्याय मिळण्याची पारदर्शक, सुसंगत आणि वेळबद्ध व्यवस्था ... करणे आवश्यक आहे.

दुसऱ्या बाजूला ओबीसी ...ाचे आंदोलनही सरकारने ...क्याच गांभीर्याने घेतले ...हिजे. मराठा समाजाला ...ाय देताना ओबीसींच्या विद्यमान आरक्षणावर गदा येणार नाही, हा विश्वास निर्माण करणे सरकारचे घटनात्मक आणि राजकीय कर्तव्य आहे. लक्ष्मण हाके ...ंच्या नेतृत्वाखाली उभ्या ...ेल्या आंदोलनाने सरकारला ...ंदेश दिला आहे की, एका समाजाच्या मागण्यांवर तोडगा काढताना दुसऱ्या समाजाच्या मनात असुरक्षितता निर्माण झाली, तर सामाजिक संघर्षाची नवी रेषा आखली जाईल.

मराठा विरुद्ध ओबीसी असा संघर्ष उभा राहणे कोणाच्याही हिताचे नाही. दोन्ही समाजांतील सामान्य तरुण आज शिक्षण, रोजगार आणि आर्थिक संधींसाठी संघर्ष करीत आहेत. बेरोजगारीची समस्या समान आहे, स्पर्धेचा ताण समान आहे आणि भविष्यातील असुरक्षितताही समान आहे. अशा परिस्थितीत समाज विरुद्ध समाज अशी लढाई निर्माण करणे हा प्रश्न सोडविण्याचा मार्ग नसून, तो आणखी गुंतागुंतीचा करण्याचा मार्ग आहे.

सरकारने आता या प्रश्नाकडे केवळ राजकीय व्यवस्थापन म्हणून पाहू नये. आंदोलनकर्त्यांशी चर्चा करून काही दिवसांचा अवधी मिळविणे आणि पत्रकार परिषदेत घोषणा करणे एवढ्याने प्रश्न सुटणार नाही. हैदराबाद गॅझेट, सातारा आणि कोल्हापूर गॅझेट, कुणबी नोंदी, जात प्रमाणपत्र आणि जात वैधता, या सर्व मुद्द्यांवर स्पष्ट शासन निर्णय, एकसमान कार्यपद्धती आणि कालबद्ध अंमलबजावणी आवश्यक आहे.

प्रत्येक जिल्ह्यातील जात पडताळणी समित्यांसाठी समान निकष ठरविले पाहिजेत. एका ठिकाणी ग्राह्य धरले जाणारे पुरावे दुसऱ्या ठिकाणी अमान्य ठरत असतील, तर नागरिकांचा व्यवस्थेवरील विश्वास ढासळणारच. शिंदे समितीच्या नोंदी आणि विविध गॅझेटमधील पुराव्यांचे कायदेशीर स्थान नेमके काय, याबाबतही सरकारने संभ्रमाला वाव न देता स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली पाहिजेत.

आज महाराष्ट्रातील जनतेला सर्वांत मोठी गरज आहे ती विश्वासाची. मनोज जरांगे यांचे आंदोलन सरकारवर दबाव निर्माण करीत आहे; ओबीसींचे प्रति आंदोलन सामाजिक समतोलाबाबत धोक्याची घंटा वाजवीत आहे; तर वैजापूरच्या विद्यार्थ्यांचे प्रकरण प्रत्यक्ष अंमलबजावणीतील त्रुटी उघड करीत आहे. या तिन्ही घटनांकडे स्वतंत्र आणि वेगवेगळ्या राजकीय चष्म्यातून पाहून चालणार नाही. त्या एका मोठ्या प्रश्नाची तीन रूपे आहेत.

आंदोलनकर्त्यांना शब्द नकोत, तर शासन निर्णय हवा आहे. विद्यार्थ्यांना आकडेवारी नको, तर वेळेत जात वैधता हवी आहे. ओबीसी समाजाला आश्वासन नको, तर त्यांच्या आरक्षणाच्या हक्कांचे स्पष्ट आणि कायदेशीर संरक्षण हवे आहे.

सरकारने ही तिन्ही आव्हाने एकाच वेळी सोडविण्याची राजकीय इच्छाशक्ती दाखवली, तर महाराष्ट्रात विश्वासाचे वातावरण निर्माण होईल. अन्यथा एक आंदोलन शांत होताच दुसरे उभे राहील आणि एका घोषणेवरून निर्माण झालेली आशा पुढील प्रशासकीय निर्णयाने निराशेत बदलेल.

महाराष्ट्राला आज संघर्षाचा विस्तार नको; विश्वासाचा विस्तार हवा आहे. आणि तो विश्वास केवळ भाषणांनी किंवा पत्रकार परिषदांनी निर्माण होणार नाही. तो निर्माण होईल स्पष्ट शासन निर्णयांनी, पारदर्शक प्रक्रियांनी आणि सामान्य माणसाला प्रत्यक्ष न्याय देणाऱ्या अंमलबजावणीने. म्हणूनच सरकारने घोषणा किती केल्या, त्यापेक्षा दिलेल्या शब्दाला कायद्याचा आधार देऊन सामान्य नागरिकाच्या हाती विश्वासाचा 'जीआर' कधी देणार? या प्रश्नाचे उत्तर द्यावे.

## ग्रामविकास अधिकाऱ्याला दमदाटी व शिवीगाळ, मांजरी ग्रामपंचायतची सभा वादळी, दोघांविरोधात गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** तालुक्यातील मांजरी येथील ग्रामपंचायतीची ग्रामसभा ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी सुरेश डोंगरे यांना झालेल्या दमदाटी आणि शिवीगाळ यामुळे ग्रामविकास अधिकारी भोवळ येऊन बेशुद्ध झाल्याने वादळी ठरली. याबाबत दोन जणांवर राहुरी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, मांजरी येथे ता.३१ रोजी सकाळी ग्रामसभा बोलाविण्यात आलेली असताना ग्रामसभेत विविध विषयांचे चर्चा सुरू होती. त्यानंतर येथील सुनीता संदीप विटनोर यांनी मद्य परवाना नाहरकत दाखला मिळण्यासाठी अर्ज दिलेला होता मात्र या अगोदर ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत याबाबत मांजरी गावात तसेच शिवारात कुणालाही मद्यार्क परवाना नाहरकत देऊ नये असा ठराव झालेला असताना सदरचा अर्ज ग्रामसभेपुढे आल्याने सदरच्या विषयावर चर्चा करण्यासाठी ग्रामविकास अधिकारी सुरेश डोंगरे यांनी सदरचा अर्ज ग्रामसभेत ठेवून त्यावर ज्या ग्रामस्थांना परवाना द्यायची भूमिका आहे अशा ग्रामस्थानी हात वर करण्यासाठी सांगितले मात्र यावर कुठल्याही गग्रामस्थांमधून होकार न आल्याने सदरचा अर्ज मंजूर करता आला नाही याचा राग आल्याने संदीप एकनाथ विटनोर व त्यांचे वडिल एकनाथ विटनोर यांनी मला ग्रामसभेच्या कामकाज सुरू असताना दमदाटी करून शिवीगाळ केल्याचे डोंगरे यांनी आपल्या फिर्यादीत म्हटले आहे. याबाबत ही घटना झाल्यानंतर डोंगरे यांनी चक्कर आल्याने ते ग्रामसभेतच पडल्याने येथील ग्रामस्थानी तातडीने त्यांना येथील आरोग्य केंद्रात दाखल केले दरम्यान ग्रामसभा गुंडाळण्यात आली.

या विषयामुळे इतर सर्वच विषय अनुत्तरित राहिल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी पहावयास मिळाली. डोंगरे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास राहुरी पोलीस करत आहेत.

## राहुरी कृषी विद्यापीठाच्या तंत्रज्ञानाची किमया; १० एकरांत १५४ टन डाळिंब, २.७८ कोटींचे उत्पन्न

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केल्यास शेतीत उत्पादन आणि उत्पन्नात मोठी वाढ होऊ शकते, याचा प्रत्यय इंदापूर तालुक्यातील शेळगाव येथील प्रगतिशील शेतकरी बापूसाहेब दुधाळ यांच्या डाळिंब बागेतून आला आहे. दुधाळ यांनी विद्यापीठाच्या तंत्रज्ञानाचा अवलंब करून १० एकर क्षेत्रातून तब्बल १५४ टन डाळिंब उत्पादन घेत २ कोटी ७८ लाख रुपयांचे उत्पन्न मिळविले आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी शेळगाव येथील डाळिंब व पेरू उत्पादक शेतकऱ्यांच्या बागांना भेट देऊन पाहणी केली. यावेळी शासकीय कृषी महाविद्यालय, पुणे येथील सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुभाष भालेकर, अखिल भारतीय कोरडवाहू फळपिके संशोधन प्रकल्पाचे उद्यानविद्यावेत्ता डॉ. सुभाष गायकवाड तसेच कृषी सहाय्यक काकड व गोसावी उपस्थित होते. दुधाळ यांनी बागेसाठी एकरी सुमारे ७ लाख रुपये उत्पादन खर्च झाल्याची माहिती दिली. त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीचे कौतुक करताना डॉ. खर्चे यांनी उपस्थित डाळिंब उत्पादकांशी संवाद साधला. विद्यापीठाने विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचा शास्त्रीय पद्धतीने अवलंब करण्याचे तसेच विद्यापीठ निर्मित फुले सुपर बायोमिक्स व सूक्ष्म अन्नद्रव्यांचा योग्य वापर करण्याचे आवाहन त्यांनी केले.यावेळी सुनील भोग, हर्षल भोग यांच्या डाळिंब व पेरू बागांची तसेच कृषी पदवीधर शेतकरी तुषार खराडे यांच्या पेरू बागेचीही पाहणी करण्यात आली. कृषी पदवीधरांनी विद्यापीठाशी सातत्याने संपर्क ठेवून आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचविण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन डॉ. खर्चे यांनी केले. विद्यापीठाचे संशोधन, कृषी पदवीधर आणि शेतकरी यांच्यातील समन्वयातून उत्पादनक्षमता व आर्थिक उत्पन्न वाढण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## एनसीएमसी कार्डसाठी मुदतवाढ द्या; सवलतही कायम ठेवा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**कोळपेवाडी :** एसटी महामंडळाने ज्येष्ठ नागरिक व महिला प्रवाशांसाठी १ सप्टेंबरपासून एनसीएमसी कार्ड अनिवार्य केले आहे. मात्र ग्रामीण भागासह कोपरगाव मतदारसंघातील अनेक लाभार्थ्यांची तांत्रिक अडचणींमुळे नोंदणी अद्याप पूर्ण झालेली नाही. त्यामुळे एनसीएमसी कार्ड काढण्यासाठी मुदतवाढ द्यावी आणि कार्ड मिळेपर्यंत पूर्वीप्रमाणे प्रवासी सवलत सुरू ठेवावी, अशी मागणी आमदार आशुतोष काळे यांनी परिवहन मंत्री प्रतापराव सरनाईक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. ग्रामीण भागातील जवळपास ५० टक्के लाभार्थ्यांची कार्ड नोंदणी बाकी असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. नेटवर्कची समस्या, अपुरी यंत्रणा तसेच अंगठ्याचे ठसे जुळत नसल्याने अनेकांना कार्ड मिळण्यात अडचणी येत आहेत. परिणामी कार्ड नसलेल्या महिला व ज्येष्ठ नागरिकांना सवलतीऐवजी पूर्ण तिकीट काढावे लागत असून त्यांच्यावर अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे. त्यामुळे पात्र लाभार्थ्यांना कार्ड काढण्यासाठी पुरेसा अवधी देऊन, तोपर्यंत सवलत कायम ठेवण्याचे निर्देश एसटी महामंडळाला द्यावेत, अशी मागणी आ. काळे यांनी केली आहे.

## बंद झालेली अहिल्यानगर-दहिगाव एसटी पुन्हा धावली




> अहिल्यानगर-दहिगाव बससेवा पुन्हा सुरू झाल्याने कुकाणा व परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. नागरिकांची प्रवासाची गैरसोय दूर झाली आहे. बससेवा सुरू करण्यासाठी माजी आ. बाळासाहेब मुरकुटे यांनी केलेला पाठपुरावा आणि रितेश भंडारी यांनी केलेले प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहेत. त्यांच्या प्रयत्नांना अवघ्या दोन दिवसांत यश मिळाले, ही कुकाणा ग्रामस्थांसाठी आनंदाची बाब आहे.
>
> **- शुभांगी कचरे,**
> **उपसरपंच, ग्रामपंचायत कुकाणा**

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा |** काही काळापासून बंद असलेली अहिल्यानगर-दहिगाव एसटी बससेवा अखेर पुन्हा सुरू करण्यात आली असून, या बससेवेमुळे कुकाणा व परिसरातील विद्यार्थी, नोकरदार, शेतकरी, व्यापारी आणि सर्वसामान्य प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. बस कुकाणा बसस्थानकावर दाखल होताच ग्रामस्थांनी जल्लोषात स्वागत करून आनंद व्यक्त केला.

बससेवा पूर्ववत करण्यासाठी माजी आ. बाळासाहेब मुरकुटे यांनी पुढाकार घेत सातत्याने पाठपुरावा केला. त्याचबरोबर कुकाणा येथील रितेश भंडारी यांनीही बससेवा पुन्हा सुरू व्हावी यासाठी संबंधित प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला.

विशेष म्हणजे, बससेवा सुरू करण्याबाबत पत्रव्यवहार केल्यानंतर अवघ्या दोन दिवसांत बस पुन्हा सुरू झाल्याने कुकाणा परिसरातील प्रवाशांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

आज बस कुकाणा बसस्थानकावर दाखल होताच ग्रामस्थांच्या वतीने बसचे उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी रितेश भंडारी, कुमार देशमुख, संजय भंडारी, रज्जाक इनामदार, अण्णा गव्हाणे, नितीन निकम, सुनील पंडित, जावेद तांबोळी, रफिक शेख यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

## मराठा सुकाणू समितीच्यावतीने जरांगे यांच्या समर्थनात निषेध सभा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील नेवासा फाटा येथील राजमुद्रा चौकात सकल मराठा समाज नेवासा तालुका तसेच मराठा सुकाणू समितीच्या वतीने मनोज जरांगे-पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे पुकारलेल्या उपोषणाला पाठिंबा देत निषेध सभा घेण्यात आली. यावेळी मराठा समाजाला आरक्षण मिळावे, तसेच कुणबी प्रमाणपत्राचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी करण्यात आली.

या सभेस मराठा सुकाणू समितीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष गणेश झगरे, मुकिंदपूरचे सरपंच सतीश निपुंगे, नितीन निमसे, दीपक शिंदे, गणेश निपुंगे, सुनील जगताप, राहुल जामदार, वंचित बहुजन आघाडीचे योगेश गायकवाड, डॉ. कृषिराज टकले, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष दत्ताभाऊ कांगणे, प्रसाद पठारे, बाळासाहेब निपुंगे, मनोज झगरे, दीपक बर्डे, योगेश कांगुणे, आजिनाथ जामदार, नानासाहेब जामदार, पत्रकार बादल परदेशी, आबासाहेब शिरसाट यांच्यासह शिवभक्त व नेवासा फाटा परिसरातील शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी गणेश झगरे यांच्यासहसरपंच सतीशदादा निपुंगे यांनीही मराठा आरक्षणाच्या मागणीला पाठिंबा व्यक्त केला. ''सभेदरम्यान उपस्थितांनी मराठा आरक्षणाच्या मागणीला पाठिंबा व्यक्त करत शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी केली.

## म्हैसगावच्या प्राथमिक आरोग्य केंद्राकडे ग्रामस्थांची पाठ

### कोट्यवधींची इमारत, नऊ कर्मचारी, तरीही प्रसूतीसाठी खासगी रुग्णालयांचा आधार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**म्हैसगाव :** राहुरी तालुक्यातील म्हैसगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कारभाराबाबत ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेल्या इमारतीला अनेक वर्षे उलटूनही आवश्यक आरोग्य सुविधा पूर्ण क्षमतेने उपलब्ध नसल्याची ग्रामस्थांची तक्रार आहे. विविध पदांवर नऊ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असली, तरी आवश्यक साधनसामग्री व मूलभूत सुविधा नसताना हे कर्मचारी नेमके काम काय करणार, असा सवाल उपस्थित केला जात आहे.




म्हैसगाव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे बांधकाम २२ मे २०१८ रोजी पूर्ण झाले. वन विभागाने जागा उपलब्ध करून दिल्यानंतर शासनाच्या माध्यमातून सुसज्ज इमारत उभारण्यात आली. या केंद्रामुळे म्हैसगावसह परिसरातील नागरिकांना मोफत व दर्जेदार आरोग्य सेवा मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र ती अद्याप पूर्ण झालेली नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

नवीन स्टाफ, मात्र सुविधा अपुऱ्या आरोग्य केंद्रासाठी नियुक्त करण्यात आलेल्या स्टाफला जवळपास वर्षभराचा कालावधी झाला आहे. मात्र वैद्यकीय उपकरणे, आवश्यक साधनसामग्री आणि इतर सुविधा अपुऱ्या असल्याने कर्मचाऱ्यांनाही काम करताना अडचणी येत असल्याचे सांगितले जाते. काही कर्मचाऱ्यांना मानधन मिळाले नसल्याची तक्रारही ग्रामस्थांनी केली आहे.

प्रसूतीसाठी खासगी रुग्णालयाचा आधार आरोग्य केंद्रात प्रसूतीची अपेक्षित सुविधा उपलब्ध नसल्याने म्हैसगाव व परिसरातील महिलांना खासगी रुग्णालयांचा आधार घ्यावा लागत आहे. एका प्रसूतीसाठी सुमारे २० ते २५ हजार रुपये खर्च येत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्यामुळे गरीब व सर्वसामान्य कुटुंबांवर आर्थिक भार पडत आहे.

दरम्यान, शासनाने कोट्यवधी रुपये खर्च करून उभारलेल्या आरोग्य केंद्राचा नागरिकांना प्रत्यक्ष लाभ मिळण्यासाठी आवश्यक वैद्यकीय उपकरणे, औषधसाठा, प्रसूती सुविधा व मूलभूत व्यवस्था तातडीने उपलब्ध करून द्यावी. नियुक्त कर्मचाऱ्यांना वेळेवर मानधन द्यावे, तसेच आरोग्य केंद्र पूर्ण क्षमतेने सुरू करावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून प्रश्न सोडवावा, अशी अपेक्षाही व्यक्त होत आहे.

## ब्रम्हाकुमारी विश्वविद्यालयाच्या ओम शांती केंद्रास भास्करगिरी बाबांची भेट

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** येथील श्री ज्ञानेश्वर कॉलेज परिसरात असलेल्या प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय ओम शांती केंद्र ''परमज्योती भवन''ला तीर्थक्षेत्र देवगड येथील गुरूदेव दत्त पिठाचे प्रमुख व राष्ट्रसंत भास्करगिरी बाबांनी श्रावण मासाच्या निमित्ताने भेट दिली. येथील परिसर स्वच्छता पाहून समाधान व्यक्त केले.



यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी ओम शांती केंद्राच्या प्रमुख राजयोगिनी सरलादिदी व राजयोगिनी वंदना दीदी, लता दिदी, समृद्धी दिदी यांनी गुरुवर्य भास्करगिरी बाबांचे पुष्पवृष्टी करत स्वागत केले. यावेळी प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध आध्यात्मिक कार्याची माहिती वंदना दिदींनी यावेळी दिली. ओम शांती केंद्राच्या वतीने भास्करगिरी बाबांचा लक्ष्मी नारायणाची प्रतिमा देऊन व पुष्पहार घालून यावेळी सन्मान करण्यात आला. यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी केशर उद्योग समुहाचे प्रमुख उद्योजक सुरेशराव उभेदळ, मुंगसे गुरुजी, संभाजीराव पवार,सरपंच सतीश निपुंगे, माजी नगरसेविका डॉ. निर्मला सांगळे, पत्रकार बाळासाहेब देवखिळे, विजय दहीवाळकर, आण्णासाहेब कंक, रितेश कराळे, राजू गाडेकर, अक्षय देवखिळे, शीतल देवखिळे, राजकुमार पाषाण, बाबासाहेब भागवत यांच्यासह ओम शांती केंद्रातील भाऊ व बहिणी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राजयोगिनी वंदना दीदींनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर पत्रकार सुधीर चव्हाण यांनी आभार मानले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द • ख • ल

### प्रवरा ग्रामीण रुग्णालयात १० दिवसांचे आरोग्य शिबीर

**प्रवरानगर** : प्रियदर्शनी ग्रामीण महिला मंडळाच्या संस्थापक सिंधूताई विखे यांच्या जयंती निमित्ताने प्रवरा मेडीकल ट्रस्टच्या डॉ. विठ्ठलराव विखे पाटील प्रवरा ग्रामीण रूग्णालय (पीएमटी) येथे बुधवार दि. २ सप्टेंबर ते शुक्रवार दि. ११ सप्टेंबर २०२६ या कालावधीत दहा दिवसांचे भव्य विशेष मोफत आरोग्य शिबीराचे आयोजन प्रवरा इन्स्टिट्युट ऑफ मेडीकल सायन्सेस या अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. राजेंद्र विखे यांच्या संकल्पनेतून करण्यात आले आहे. यापुर्वी १५ दिवसांचे मोफत आरोग्य शिबीर घेण्यात आले होते. परंतू खास लोकआग्रहास्तव शिबीराचा आणखी दहा दिवसांचा कालावधी वाढविण्यात आला आहे. या मोफत शिबीराचा लाभ डमीट रूग्णांनाच घेता येईल. जे रूग्ण डमीट झाले आहेत अशा सर्व रूग्णांच्या सर्व नियमीत प्रयोगशाळा तपासण्या मोफत केल्या जातील. नियमीत सोनोग्राफी, एक्सरे मोफत केल्या जातील, तसेच प्लेन सीटीस्कॅन या तपासणीवर ५० टक्के सवलत दिली जाणार आहे. तसेच शिबीरासाठी मंजूर यादीतील औषधे मोफत दिली जाणार आहेत.

### माळी समाजाचा राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा उत्साहात

**श्रीरामपूर** : माळी समाज विकास संस्था वधू-वर सूचक केंद्र, पुणे आणि अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने माळी समाजाचा राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा शिर्डी येथील निसर्ग रिसॉर्टमध्ये उत्साहात पार पडला. माजी नगराध्यक्ष डॉ. के. वाय. गाडेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या मेळाव्यास श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्षनाथ गाडीलकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मेळाव्यात ९३ वर आणि ३७ वधूंनी सहभाग नोंदवला. अहिल्यानगर, जळगाव, धुळे, मालेगाव, छत्रपती संभाजीनगर, बीड, अकोले, संगमनेर, श्रीरामपूर, कोपरगाव, नाशिक व ठाणे आदी भागांतून वधू-वर सहभागी झाले होते. सहभागी उमेदवारांनी स्वतःचा परिचय करून देत अपेक्षित जीवनसाथीबाबत मनोगत व्यक्त केले. यावेळी आधार फाउंडेशनचा राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल महात्मा फुले समता परिषदेचे राहाता तालुका सरचिटणीस संजय इनामके यांचा गोरक्षनाथ गाडीलकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

### गोणेगाव चौफुला येथील रामकृष्णाश्रमात किर्तन महोत्सव



**नेवासा** : तालुक्यातील गोणेगाव चौफुला येथील श्री विठ्ठल रुख्मिणी आध्यात्मिक केंद्र संचलित रामकृष्णाश्रमामध्ये आश्रमाचे प्रमुख महंत वेदमूर्ती श्री भगवान महाराज जंगले शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड हरिनाम सप्ताह व श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळयाला प्रारंभ झाला असून या निमित्ताने होणाऱ्या किर्तन महोत्सवाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.शनिवार दि. ५ सप्टेंबर २०२६ पर्यंत हा सोहळा चालणार आहे. वैकुंठवाशी ह.भ.प.बन्सी महाराज तांबे व वैकुंठवाशी ह.भ.प. रामकृष्ण महाराज काळे (गुरुजी), बीड लाडेवडगाव येथील वेदांत साधना स्थली गुरुकुलचे महंत परिव्राजकाचार्य स्वामी भारतानंदगिरीजी महाराज यांच्या कृपा आशिर्वादाने होत असलेल्या या सोहळयाचे नेतृत्व ह.भ.प. वेदांताचार्य भगवानजी महाराज जंगले (शास्त्री) हे करत आहे.

# राहुरीत नगरपरिषदेचा अतिक्रमणांवर हातोडा

## आधी धनदांडग्यांचे अतिक्रमण काढा; नागरिकांची प्रतिक्रिया



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने दि. २ सप्टेंबर रोजी राहुरी शहरात अतिक्रमण काढण्यास सुरुवात केली. मात्र शहरातील धन दांडग्यांचे पक्के अतिक्रमण काढण्यास नगरपरिषद प्रशासन धजावत नसल्याचा आरोप सर्व सामान्य जनतेमधून होत आहे. राहुरी शहरातील प्रत्येक रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झालेले आहे. छोट्या मोठ्या टपऱ्या सह मोठ्या पक्क्या इमारती अतिक्रमणात आहेत. त्यामुळे रहदारीस नेहमीच अडथळे निर्माण होत असतात. वाहतूकीची नेहमीच कोंडी होत असते. राहुरी नगरपरिषदच्या मुख्याधिकारी विद्या पाटील यांनी दि. २ सप्टेंबर २०२६ रोजी पोलिस बंदोबस्त घेऊन राहुरी शहरातील अतिक्रमणे काढण्यास सुरुवात केली.

शहरातील नवीपेठ, आडवी पेठ, भागीरथीबाई शाळा रोडला असलेल्या छोट्या टपऱ्या काढण्यात आल्या. त्यामुळे रस्ता मोकळा झाला आहे. या प्रसंगी वंचितचे पिंटूनाना साळवे यांनी नगरपरिषदच्या कारभारा बाबत संताप व्यक्त केला. ते म्हणाले कि, शहरातील नवीपेठ, आडवी पेठ, शनी चौक, शिवाजी चौक, जुनी पेठ आदि भागात मोठ मोठ्या इमारती अतिक्रमणात आहेत. शहरातील पक्के अतिक्रमण काढण्यास नगरपरिषद प्रशासन धजावत नाही.

प्रत्येक वेळी गोर गरीबांनाच त्रास दिला जातो. अगोदर धन दांडग्यांचे पक्के अतिक्रमण काढा नंतर गोर गरीबांचे अतिक्रमण काढा.

धन दांडग्यांचे अतिक्रमण तसेच ठेवून फक्त गोर गरीबांचे अतिक्रमण काढले तर मी कोणत्याही वेळी नगरपरिषद कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु करेल, असा इशारा पिंटूनाना साळवे यांनी दिला.

# वीज उपकेंद्रासाठी महिनाभरात जागा उपलब्ध करा

## आ. खताळ यांची नगरपरिषद प्रशासनाला सूचना



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : शहरातील कमी दाबाचा व वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा कायमस्वरूपी सुरळीत करण्यासाठी नवीन ३३/११ के.व्ही. विद्युत उपकेंद्र उभारण्याच्या कामाला गती देण्याची मागणी आमदार अमोल खताळ यांनी केली आहे.

यासाठी संगमनेर नगरपरिषद प्रशासनाने महावितरणला एका महिन्याच्या आत जागा उपलब्ध करून द्यावी, अशा सूचना त्यांनी निवेदनाद्वारे केल्या आहेत. कोल्हेवाडी रोडवरील जलकुंभाशेजारी नगरपरिषदेच्या मालकीची सुमारे ९.५ गुंठे जागा उपकेंद्रासाठी देण्याची मागणी महावितरणने केली होती. यासंदर्भात नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेने रेडी रेकनर दरानुसार जागा भाडेतत्त्वावर देण्यास यापूर्वीच मान्यता दिली आहे. मात्र, सदर जागा रहिवासी भागातील ओपन स्पेस असल्याने तसेच भाडेतत्त्वावर देताना काही प्रशासकीय अडचणी असल्याने हा विषय प्रलंबित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दरम्यान, महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांसोबत झालेल्या बैठकीत जागा उपलब्ध झाल्यास उपकेंद्राचे काम तातडीने सुरू करता येईल, असे स्पष्ट करण्यात आले.

त्यामुळे नागरिकांचे हित लक्षात घेऊन योग्य त्या अटी-शर्तींवर जागा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही तातडीने करावी, अशी सूचना आमदार खताळ यांनी केली आहे.

# लौकीच्या उपसरपंचपदी काळे गटाच्या दीपाली खटकाळे



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : कोपरगाव तालुक्यातील लौकी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदासाठी झालेल्या निवडणुकीत काळे गटाच्या सौ. दीपाली विष्णू खटकाळे यांची निवड झाली. विद्यमान उपसरपंच किरण शेळके यांनी राजीनामा दिल्याने हे पद रिक्त झाले होते. सरपंच आजिनाथ खटकाळे यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक प्रक्रिया पार पडली.

उपसरपंचपदासाठी काळे गटाकडून दीपाली खटकाळे, तर कोल्हे गटाकडून भीमाबाई बाबासाहेब खटकाळे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. मतदानात दोन्ही उमेदवारांना प्रत्येकी चार मते मिळाल्याने निवडणूक अटीतटीची झाली. त्यानंतर सरपंच आजिनाथ खटकाळे यांनी निर्णायक मत दीपाली खटकाळे यांच्या बाजूने दिले. ग्रामसेवक तथा निवडणूक अधिकारी संकेत शिंगाडे यांनी त्यांच्या विजयाची घोषणा केली.

निवडीनंतर बोलताना दीपाली खटकाळे यांनी, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांच्या सहकार्याने गावाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिकपणे काम करणार असल्याचे सांगितले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य, काळे गटाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थांनी नवनिर्वाचित उपसरपंचांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

# नेवासा तालुक्याच्या प्रारूप मतदार यादीत २० हजार ५२६ मतदारांची घट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : भारत निवडणूक आयोगाच्या छायाचित्र मतदार याद्यांच्या सखोल पुनरिक्षण (डखठ) कार्यक्रमांतर्गत नेवासा तालुक्याची प्रारूप मतदार यादी ३१ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध झाली. पुनरिक्षणापूर्वी तालुक्यात २ लाख ८५ हजार ९१५ मतदार होते. आता ही संख्या २ लाख ६५ हजार ३८९ झाली असून, एकूण २० हजार ५२६ मतदारांची घट झाली आहे.

एसआयआर प्रक्रियेत ६ हजार ३९० मयत, ३ हजार ८५२ दुबार, ८ हजार ४०७ स्थलांतरित तसेच १ हजार ८०५ अनुपस्थित मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. नव्या यादीत १ लाख ३७ हजार २३३ पुरुष आणि १ लाख २८ हजार १५६ महिला मतदार आहेत.

मतदारांनी प्रारूप यादीतील आपले नाव, वय, छायाचित्र व अन्य तपशील तपासून खात्री करावी. नाव नसल्यास आवश्यक कागदपत्रांसह नमुना क्रमांक ६ भरून बीएलओकडे जमा करावा, असे आवाहन उपजिल्हाधिकारी सुभाष दळवी यांनी केले. नेवासा येथे झालेल्या पत्रकार परिषदेस नायब तहसीलदार सुरेश गोसावी उपस्थित होते.

प्रारूप यादीवर ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबरपर्यंत दावे-हरकती दाखल करता येणार आहेत. दुरुस्तीसाठी नमुना ८, तर नाव वगळण्यासाठी नमुना ७ सादर करता येईल. तालुक्यातील २८८ मतदान केंद्रांसाठी २६ अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत.

# संजीवनी सहकारी पतसंस्थेला ४ कोटींचा नफा । सभासदांना १५ टक्के लाभांश



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : संजीवनी सहकारी पतसंस्थेने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ४ कोटी २ लाख रुपयांचा नफा मिळवित आर्थिक प्रगतीची घोडदौड कायम ठेवली आहे. संस्थेने सलग ४२ वर्षे 'अ' ऑडिट वर्ग मिळविण्याची परंपरा यंदाही कायम ठेवली असून, सभासदांना १५ टक्के लाभांश देण्यात येणार आहे. माजी मंत्री स्व. शंकररावजी कोल्हे साहेब यांनी संस्थापक म्हणून उभारलेल्या संजीवनी उद्योग समूहातील या पतसंस्थेची ४३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार, दि. १ सप्टेंबर रोजी सहजानंदनगर येथे संपन्न झाली.

सभेत उपस्थितांना प्रमुख मार्गदर्शन करताना संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे म्हणाले की, गेल्या चार-पाच वर्षांत सहकार क्षेत्रासमोर अनेक संकटे उभी राहिली. कोरोना महामारी, आर्थिक मंदी, दुष्काळ आणि महागाईमुळे बाजारपेठेवर परिणाम झाला. वेळेवर पाऊस न झाल्याने शेतकरीही अडचणीत आला. अशा प्रतिकूल परिस्थितीतही संजीवनी सहकारी पतसंस्थेने सभासद आणि जनतेचा विश्वास कायम ठेवत आपली यशस्वी वाटचाल सुरू ठेवली आहे. संस्थेचे चेअरमन राजेश परजणे यांनी अध्यक्षीय भाषणात संस्थेच्या आर्थिक प्रगतीचा आढावा मांडला.

सभासदांना १५ टक्के लाभांश देण्यात येणार असून, सलग ४२ वर्षे 'अ' ऑडिट वर्ग मिळणे ही संस्थेच्या आर्थिक शिस्तीची आणि विश्वासार्हतेची पावती असल्याचे परजणे यांनी सांगितले. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व्ही. व्ही. रोहमारे यांनी सभेसमोर संस्थेचा वार्षिक अहवाल सादर केला.

यावेळी युवा नेते आमदार विवेकभैय्या कोल्हे, संजीवनी एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन नितीनदादा कोल्हे, सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन ज्ञानेश्वर परजणे यांच्यासह अरुण येवले, शिवाजी वक्ते, बाळासाहेब वक्ते, संजय होन, आप्पासाहेब दवंगे, केशवराव भवर, राजेंद्र कोळपे, रमेश घोडेराव, त्र्यंबकराव सरोदे, साहेबराव कदम, विलास कुलकर्णी आदी उपस्थित होते.

# वर्षश्राद्धातून वारकरी संप्रदायाला मदतीचा हात

## मिसाळ कुटुंबाकडून वारकरी शिक्षण मंडळाला ५१ हजारांची मदत







**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : पूर्वजांच्या स्मृती जपताना सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवत नेवासा तालुक्यातील गणेशवाडी येथील मिसाळ परिवाराने वर्षश्राद्धानिमित्त अनोखा सामाजिक उपक्रम राबविला. स्व. एकनाथ काशिनाथ मिसाळ यांच्या प्रथम वर्षश्राद्धानिमित्त वारकरी संप्रदायातील गरजू व्यक्तींना पखवाज व मृदंगाचे वाटप करण्यात आले. तसेच सुरेगाव येथील वारकरी शिक्षण मंडळाला ५१ हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली.

मुंबई येथील अपर जिल्हाधिकारी गणेश एकनाथ मिसाळ यांच्या पुढाकारातून सोमवारी (दि. ३१ ऑगस्ट) सोनई येथील राजलक्ष्मी मंगल कार्यालयात हा कार्यक्रम झाला. ह.भ.प. उद्धव महाराज मंडलिक यांच्या कीर्तन-प्रवचनाने कार्यक्रमाला आध्यात्मिक उंची मिळाली.यावेळी बोलताना उद्धव महाराजांनी मिसाळ परिवाराच्या त्यागाचा विशेष उल्लेख केला. पत्नी अलका मिसाळ यांनी पतीला यकृताचा भाग दान करून त्यांना तीन वर्षे जीवनदान दिले, हा त्याग प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. स्व. एकनाथ मिसाळ यांनी मुलांना दिलेले संस्कार आणि प्रामाणिकपणे कमावलेली माणुसकी व विश्वास हीच त्यांची खरी संपत्ती असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावेळी आमदार विठ्ठलराव लंघे, माजी मंत्री शंकरराव गडाख, ह.भ.प. विश्वासराव गडाख, सुनील गडाख, उदयन गडाख, सचिन देसारडा यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते. विशेष म्हणजे नेहमीच्या प्रदीर्घ श्रद्धांजली भाषणांना फाटा देत प्रत्यक्ष सामाजिक उपक्रमातून श्रद्धांजली वाहण्यात आल्याने उपस्थितांनी मिसाळ परिवाराचे कौतुक केले. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी ह.भ.प.उद्धव महाराज यांनी धर्म व जातीपंथ पलीकडे जाऊन माणसाने माणसासारखं वागले पाहिजे व आई वडिलांविषयी महत्व विशद केले.

पूर्वजांच्या स्मृती चिरंतन राखत मिसाळ परिवाराचा योगदान देण्याच्या या स्तुत्य उपक्रमास ग्रामस्थांनी आणि मान्यवर यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उपक्रमाचे कौतुक केले. उपक्रम आयोजकमुंबई (वांद्रे )येथील अप्पर जिल्हाधिकारी गणेश मिसाळ, शनिकृपा ट्रेडिंगचे आडतदार दीपक मिसाळ, कोमल मिसाळ, अहिल्यनगरचे भूमिअभिलेखचे उपअधीक्षक अविनाश मिसाळ, मातोश्री अलका मिसाळ, जावई मयूर सानप यांनी मनापासून आभार मानले.

### मान्यवराच्या श्रद्धांजली मनोगतावर ब्रेक

यां वर्षाश्रद्धा निमित्ताने वेळखाऊ, व नागरिकांना नकोसी असणारी इतरत्र श्रद्धांजली भाषणाला ब्रेक दिल्याचे यां ठिकाणी जाणवल्याने उपस्थित मध्ये प्रभाव जाणवला.

# थत्ते मैदानावर पोलिसांची धडक कारवाई

## ३२ वाहनांवर दंडात्मक कारवाई



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : शहरातील थत्ते मैदान तसेच महाले पोद्दार शाळेसमोरील क्रिकेट मैदानावर रात्रीच्या वेळी मद्यपान व हुल्लडबाजी करणाऱ्या तरुणांविरोधात पोलिसांनी मंगळवारी रात्री धडक कारवाई केली. अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, पोलीस निरीक्षक विशाल खैरे व पोलीस पथक तसेच आरसीपी पथकाने रात्री ८ ते १० या वेळेत या परिसरात तपासणी केली. कारवाईदरम्यान मैदानांवर विनाकारण बसलेले तसेच मद्यपान करताना आढळून आलेल्या सुमारे ३२ व्यक्ती व वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. यामध्ये श्रीरामपूर शहरातील गोंधवणीसह बाहेरील परिसरातील तरुणांचाही समावेश असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.

काही तरुण केवळ गप्पागोष्टी करण्यासाठी मैदानावर येऊन बसत असल्याचेही आढळले. थत्ते मैदान परिसरात पूर्णपणे ब्लॅक फिल्म लावलेल्या दोन चारचाकी वाहनांवरही पोलिसांनी कारवाई केली. रात्रीच्या वेळी कुटुंबासह फिरण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना हुल्लडबाज तरुणांमुळे त्रास होत असल्याच्या तक्रारी परिसरातील नागरिकांकडून करण्यात आल्या होत्या. त्याची दखल घेत अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या पुढाकारातून ही कारवाई करण्यात आली. यापुढेही अशा प्रकारच्या कारवाया सातत्याने सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. पोलिसांच्या या कारवाईचे परिसरातील नागरिकांनी स्वागत करून सातत्याने कारवाई करण्याची अपेक्षा व्यक्त केली.


### जाहिर नोटीस

मे. अपर जिल्हाधिकारी साहेब, शिर्डी
यांचे कोर्टात

आर.टी.एस.नं.
३६/२०२६

अब्दुल गफ्फार इब्राहिम शेख--**अपेलंट**
विरुध्द
समिर रज्जाक शख, वगैरे- **रेस्पॉडंट**

ज्याअर्थी वरील अपेलंट यांनी महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ कलम २४७ अन्वये सेकंड अपिल दाखल केले आहे. त्या अपिलात तुम्ही रेस्पॉडंट नं. २) शाबीर रज्जाक शेख, ३) शाकीर रज्जाक शेख, ४) रेश्मा असलम सय्यद, ७) जमिर सत्तार शेख, ८) यासीन करिम शेख, ११) तहसीलदार, अकोले, १४) मेहरु युसुफ शेख, रेस्पॉडंट नं. २ व ३, ७ रा. कुरण रोड, संगमनेर ता. संगमनेर जि. अहिल्यानगर, रेस्पॉडंट नं. ४ रा. कोल्हेवाडी रोड, संगमनेर ता. संगमनेर जि. अहिल्यानगर, रेस्पॉडंट नं.८ रा. न्यु गौतम नगर, पार्ट नं. १, के. जी. एन. सोसायटी, आर. आर. स्टोअर्स समोर गवंडी, मंबई, रेस्पॉडंट नं. ११ रा. तहसिल कार्यालय, अकोले ता. अकोले जि. अहिल्यानगर, रेस्पॉडंट नं. १४ रा. श्रमिकनगर, संगमनेर ता. संगमनेर जि. अहिल्यानगर म्हणुन सामिल आहात. तुम्हास वरील पत्यांवर अनेक वेळा नोटीस बजावणी करून वर उल्लेखीत पत्यावर तुम्ही मिळुन आला नाही. त्याअर्थी या नोटीसने आपणास कळविण्यात येते की, सदर अपिलाचे कामकाजासंदर्भात स्वतः अथवा वकिलांमार्फत ता. १५/०१/२०२६ रोजी सकाळी ३.०० वा. या कोर्टात शिर्डी येथील अपर जिल्हाधिकारी सुनावणीचे कामी अपर जिल्हाधिकारी, शिर्डी येथे हजर रहावे असे या नोटीसमार्फत सुचित करण्यात येते आहे.

तसेच या नोटीसने आपणास असेही कळविण्यात येते की, वर निर्दिष्ट केलेल्या तारखेस आपण हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अपिलाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

आज दि. २९/०८/२०२६ रोजी माझे सही / शिक्क्यानिशी तथा न्यायालयाच्या शिक्क्यानिशी नोटीस दिली आहे.

ठिकाण - शिर्डी
दि. २९/०८/२०२६.
**क्लर्क** (शिक्का) **अपर जिल्हाधिकारी, शिर्डी**

### जाहिर नोटीस

अ‍ॅड. बी. आर. भुसारी
नेवासा कोर्ट

निशाणी क्र. ४५
दिनांक : ०१/०९/२०२६
नेमलेली तारीख १९/०९/२०२६

नेवासा येथील मे. सिव्हिल जज्ज साहेब ज्यु.डी. यांचे कोर्टात
रे.मु.नं.५९०/२०२५

**वादी**-पंढरीनाथ रंगनाथ पेटे, वगैरे
**प्रतिवादी**-दत्तात्रय राजाराम ढवण, वगैरे

नंबर मजकुरचा प्रतिदावा वादी यांनी प्रतिवादी विरुध्द दावा मिळकतीची मोजणी होऊन हद्दिच्या खुणा कायम होऊन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये प्रतिवादी नं. ३ माणिक भाऊसाहेब करचे, प्रतिवादी नं. ४ महेश भाऊसाहेब करचे, प्र. वादी नं.३ व ४ रा. सुंगधीचाळ, स्टेशन रोड, सक्कर चौक अहिल्यानगर या पत्यावर कायम स्वरुपी राहण्यास असुन परंतु प्रतिवादी नं. ३ व ४ हे जाणीव पूर्वक सदरचे समन्स नोटीस स्विकारत नाही. वादी यांनी समक्ष वर नमुद पत्त्यावर जाऊन प्रतिवादी नं. ३ व ४ यांचे शेजारील लोकांना चौकशी केली असता प्रतिवादी नं. ३ व ४ हे दाव्यातील नमुद पत्यावरच राहत असल्याची वादी यांची खात्री झालेली आहे. प्रतिवादी नं. ३ व ४ दाव्यात नमुद पत्यावर कायम स्वरुपी राहण्यास आहे. मागील तारखेस निशाणी नंबर ४२ ला सदर प्रतिवादी नं. ३ व ४ यांना दैनिक वर्तमान पत्रामध्ये जाहिर समन्स प्रसिध्द करण्यासाठी अर्ज व ॲफिडेव्हिट दिलेले होते. त्यानंतर मा. साहेबांनी निशाणी नं. ४२ वर प्रतिवादी नं.३ व ४ करीता वर्तमान पत्रामध्ये जाहिर समन्स प्रसिध्द करण्याचा आदेश केलेला आहे.

तरी प्रतिवादी नं. ३ माणिक भाऊसाहेब करचे, प्रतिवादी नं. ४ महेश भाऊसाहेब करचे ही जाहिर नोटीस प्रसिध्द दि. १९/०९/२०२६ या नेमलेल्या तारखेच्या दिवशी किंवा ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अगर वकिलामार्फत सर्व कागदपत्रानिशी या न्यायालयात उपस्थित रहावे. उपस्थितीत राहण्यास कसुर केल्यास न्यायालय पुरावा घेऊन योग्य ते आदेश पारीत करेल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०१/०९/२०२६ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले असे.

**कामगिरी लिपिक**
**सह दिवाणी न्यायालय,**
**क स्तर, नेवासा**
(शिक्का)
**हुकूमावरुन**
**सहा.अधिक्षक**
**सह दिवाणी न्यायालय,**
**क स्तर, नेवासा**

### जाहीर नोटीस

तहसिल कार्यालय कोपरगांव
क्र. कावि/फौजदारी/१७३/२०२६
कोपरगांव दि. २४/०८/२०२६

कोपरगांव येथील मे. तहसिलदार साहेब यांचे कोर्टात.
मोहंमदअली कलीम शेख, रा. कोपरगांव ता. कोपरगांव जि. अहिल्यानगर,
विरुध्द
निबंधक जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी तथा नगरपरिषद कोपरगांव
ता. कोपरगांव, जि. अहिल्यानगर

ज्याअर्थी, अर्जदार मोहंमदअली कलीम शेख रा. कोपरगांव ता. कोपरगांव जि. अहिल्यानगर यांचे जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये अर्जदार नामे मोहंमदअली कलीम शेख यांची आई या दिनांक. १५/०४/१९८७ रोजी मौजे कोपरगांव ता. कोपरगांव येथे प्रसुत होऊन अर्जदार नामे मोहंमदअली कलीम शेख यांचा जन्म झाला आहे. सदर अर्जदार यांचे जन्माची नोंद नगरपरिषद कोपरगांव ता. कोपरगांव जि. अहिल्यानगर यांचेकडे अनावधानाने करावयाची राहुन गेली आहे. तथापी अर्जदार यांचे जन्माची नोंद जन्म मृत्यु रजिष्टरला नोंद होण्याकामी तसा मे. कोर्टचा आदेश होण्याकामी चौकशी अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांनी त्यांचे जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये, अर्जदार यांचे जन्म दिनाक १५/०४/१९८७ रोजी मौजे कोपरगांव ता. कोपरगांव येथे झाला आहे. अर्जदार यांचे जन्माची नोंद नगरपरिषद कोपरगांव ता. कोपरगांव जि. अहिल्यानगर, येथे होण्याबाबत कोणाची कोणतीही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्री पुराव्यांसह सदरची हरकत मे. कोर्टासमोर हजर होवून पुराव्यानिशी दाखल करावी. अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही. असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करेल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालनार नाही. याची जाहीर नोंद या जाहीर नाम्याने घेण्यात यावी, कळावे.

आज दि. २४/०८/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानीशी दिले.

**हुकूमावरुन**
**तहसिलदार कोपरगांव**

### राहुरी नगरपरिषद, राहुरी जि. अहिल्यानगर

**बांधकाम विभाग**

जा.क्र.कावी ३ / बांध / ७७१/२०२६ — दिनांक ०२/०९/२०२६

**निविदा / दरपत्रक सुचना**

राहुरी नगरपरिषदेस नगरपरिषद निधीतुन गणपती उत्सवादरम्यान करावयाच्या कामाची निविदा/ दरपत्रक सक्षम प्राधिकरणाकडे योग्य त्या वर्गात नोंद असलेल्या नोंदणीकृत व अनुभवी संस्था / मक्तेदार तसेच ई.पी.एफ परवाना धारक यांचेकडुन मागविणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाना रक्कम | निविदा फॉर्म फी | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | जलकुंभासाठी प्लास्टीक शिट पुरवठा करणे. | दरपत्रक | ३००/- | २००/- | गणपती विसर्जना चे दिवशी |
| २ | केमिकल पुरवठा करणे. | दरपत्रक | ५००/- | ३००/- | |

**नियम व अटी-**

**१.** कोरे निविदा नमुने विक्री दिनांक ०३/०९/२०२६ ते दिनांक ०९/०९/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत रोख किंमतीस विकत मिळतील. मोहरबंद निविदा दिनांक १०/०९/२०२६ रोजी सायं ०५.०० वा पर्यंत स्विकारल्या जातील. प्राप्त निविदा दिनांक ११/०९/२०२६ रोजी दुपारी ०३.०० वा. संबंधीत मक्तेदार / प्रतिनिधी यांचे समक्ष मा. मुख्याधिकारी यांचे दालनात अथवा मे. सभेत उघडल्या जातील.
**२.** निविदा इसारा रक्कम रोख स्वरुपात भरावी लागेल.
**३.** इतर सविस्तर अटी व शर्ती बांधकाम विभाग राहुरी नगरपरिषद येथे पहावयास मिळतील.

**विद्या पाटील**
**मुख्याधिकारी**
**राहुरी नगरपरिषद, राहुरी**

द • ख • ल

## साळी समाजाचे आद्य पुरुष भगवान जिव्हेश्वर यांचा जन्मोत्सव संपन्न

**अहिल्यानगर :** पृथ्वीवर पहिला हातमाग चालून वस्त्र निर्माण करणारे भगवान जिव्हेश्वर जन्मोत्सव महाराष्ट्र,गुजरात, आंध्रप्रदेश, गोवा, मध्यप्रदेश,कर्नाटक या राज्यात तर नगरमधील बागडपट्टी,सावेडी, दिलीगेट येथील मंदिरासह जिल्हात गेल्या १५ दिवसा पासून विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला अशी माहिती स्वकुळसाळी समाजाचे महेश कांबळे यांनी दिली आहे. साळी समाजाचे कुल दैवत भगवान जिव्हेश्वर याच्या विषयी माहिती देताना ते म्हणाले भगवान जिव्हेश्वरांचे संक्षिप्त चरित्र मध्ये आद्य वस्त्र निर्माता भगवान जीवेश्वर आहे हे आपल्याला समजते. कैलास पुराच्या विराजत असलेल्या प्रथमगणांनी श्री शिवशंकराची स्तूती केली.ते ध्यानावस्थेतून जाग्रस्थ झाले,महाविष्णुस व अमरगणांना पाहून विस्मित झाले.स्मित करून त्यांच्या येण्याचे कारण त्यांनी विचारले.देवांनी निवेदिले,ऋपरमेश्वरा,आदिमायेकडून सष्टीची रचना झाली.तिच्या सत्व,रज,तम या त्रिगुणांपासून ब्रम्हा,विष्णू,महेशाची उत्पत्ती झाली.ब्रम्हाने ब्रम्हांडाची रचना करून,पंचमहाभूतांना निर्मून, देव,दानव,मानव व विभिन्न जीवकोटिंना जन्म दिला.पण देव,दानव व मानव इतर प्राण्यासारखे नग्नावस्थेतच आहेत.त्यांच्या लज्जा रक्षणार्थ वस्त्राची निर्मिती झाली पाहिजे.हे महादेवा, वस्त्रानिर्मितीची व्यवस्था आपण करावी अशी विज्ञापना करण्यास आपल्या जवळ आम्ही आलो आहोत' तेव्हा महादेवांनी आदिमायेचे स्मरण केले.तिने प्रत्यक्ष होऊन श्रीशंकरास म्हटले,ऋपरमेश्वरा, वस्त्र निर्मिणार्या पुरूषाची आपण उत्पत्ती करा.

## मराठा समाजातील चळवळीतील पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा सन्मान सोहळा उत्साहात संपन्न

**अहिल्यानगर :** मराठा समाजातील विविध सामाजिक चळवळींमध्ये कार्यरत असलेल्या पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच सकल मराठा समाजातील मान्यवरांचा सन्मान सोहळा स्वराज्य बहुद्देशीय विकास संस्थेच्या वतीने उत्साहपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमास राजमाता जिजाऊ माँसाहेबांचे वंशज श्रीमंत शिवाजीराजे जाधव, सिंदखेडराजा हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी मराठा समाजाच्या सामाजिक, राजकीय व उद्योजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विविध मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या निमित्ताने मराठा समाजातील सामाजिक चळवळीतील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. समाजातील एकजूट, सामाजिक बांधिलकी आणि विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## श्रीराम मंदिरात ५ सप्टेंबरला गणपती मूर्तीची प्राणप्रतिष्ठा

**अहिल्यानगर :** बुरुडगाव रोड, चौरे मळा, श्रीराम नगर येथील श्रीराम मंदिरात गणपती बाप्पाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा सोहळा शनिवार, दि. ५ सप्टेंबर २०२६ रोजी भक्तिमय वातावरणात आयोजित करण्यात आला आहे. परिसरातील नागरिकांनी एकत्र येऊन धार्मिक श्रद्धा, सामाजिक एकोपा आणि बंधुभाव जपण्याच्या उद्देशाने या सोहळ्याचे आयोजन केले आहे. गणपती मूर्तीची प्राणप्रतिष्ठा दुपारी १२ वाजता होणार असून, त्यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. महाप्रसादाची वेळ दुपारी ४ ते रात्री ८ वाजेपर्यंत आहे. या सोहळ्यानिमित्त परिसरातील नागरिक, महिला, युवक आणि गणेशभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्री गणरायाचे दर्शन घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता समाजातील विविध घटकांना एकत्र आणणारा आणि सामाजिक सलोखा दृढ करणारा उत्सव आहे. या पार्श्वभूमीवर श्रीराम मंदिरातील प्राणप्रतिष्ठा सोहळ्यातून परिसरात भक्तीबरोबरच सामाजिक एकात्मतेचा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. विशेष सहकार्य श्रीमती सुरेखाताई नंदकुमार चौरे यांचे लाभले आहे. या मंगलमय सोहळ्यास सर्वांनी उपस्थित राहून श्री गणरायाच्या कृपेचा लाभ घ्यावा, तसेच महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन ॲड. बाळासाहेब मेहेत्रे व श्रीराम भक्त सेवा मंडळ, श्रीराम नगर, अहिल्यानगर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## पद्मशाली सोशल फाउंडेशनतर्फे महाप्रसादाचा भाविकांनी घेतला लाभ



**अहिल्यानगर :** श्रावण महिन्यातील तिसऱ्या श्रावणी सोमवारनिमित्त पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने श्री मार्कंडेय शैक्षणिक संकुल, नेप्ती नाका जवळ येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य महाप्रसाद भंडाऱ्याचा असंख्य भाविकांनी लाभ घेतला. महर्षी श्री मार्कंडेय महामुनी यांच्या महाआरतीने महाप्रसादाची सुरुवात करण्यात आली. यावेळी अजय म्याना, गोपालशेठ मंगलारप व सुशांत जाधव यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. महाप्रसादाच्या ठिकाणी आकर्षक सजावट करण्यात आली होती. नंदीवर विराजमान झालेली भगवान महादेवांची आकर्षक मूर्ती भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेत होती. तसेच महर्षी श्री मार्कंडेय यांची सुंदर मूर्तीही याठिकाणी ठेवण्यात आली होती. यंदाच्या महाप्रसादाचे विशेष आकर्षण ठरले ते पद्मशाली समाजातील प्रसिद्ध 'पप्पू बुवा'चे. 'पप्पू' म्हणजे वरण, 'बुवा' म्हणजे भात आणि त्यासोबत शिरा असा पारंपरिक महाप्रसाद भाविकांसाठी ठेवण्यात आला होता. या पारंपरिक महाप्रसादाचा भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला.

## राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धेत यशश्री मगरची चमकदार कामगिरी

**अहिल्यानगर :** पुणे येथे दि.३० ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धेत अहिल्यानगरच्या कु. यशश्री सचिन मगर हिने उल्लेखनीय कामगिरी करत प्रथम श्रेणी क्रमांक पटकावला. वेग, अचूकता आणि उत्कृष्ट गणिती कौशल्याच्या जोरावर यशश्रीने ही मानाची कामगिरी केली असून, तिच्या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. यशश्रीच्या या यशामागे तिच्या कुटुंबीयांचे प्रोत्साहन तसेच गॅलेक्सी संस्थेचे श्री. अमोल ढेपे सर आणि सौ. सोनाली ढेपे मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली यशश्रीने नियमित सराव, वेळेचे नियोजन आणि अचूकतेवर विशेष भर देत स्पर्धेची तयारी केली. राष्ट्रीय स्तरावर मिळविलेल्या या यशामुळे यशश्रीने अहिल्यानगरच्या शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कौशल्याची विशेष छाप पाडली आहे. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पालक, शिक्षक, मार्गदर्शक, मित्रपरिवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून तिचे अभिनंदन करण्यात येत असून, भविष्यातही ती अशीच यशाची नवी शिखरे गाठेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.



# गणेशोत्सवात 'डीजे' वाजणारच...

### ध्वनी प्रदूषण झाल्यास कारवाई अटळ !

### जिल्हाधिकारी कार्यालयात गणेश मंडळे व प्रशासनाची बैठक

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** यंदाच्या गणेशोत्सव सार्वजनिक गणेश मंडळांनी नियमांचे काटेकोर पालन करून ध्वनी प्रदूषण मुक्त वातावरणात साजरा करावा. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे. अन्यथा संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल अशा स्पष्ट इशारा प्रशासनाने सार्वजनिक गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना दिला आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयात सार्वजनिक गणेश मंडळाचे पदाधिकारी शांतता समितीच्या समितीचे सदस्य यांची बैठक झाली. या बैठकीला महापौर ज्योती गाडे, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा पोलीस प्रमुख मुम्मका सुदर्शन, महापालिका आयुक्त यशवंत डांगे, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कुलबर्गे, पोलीस उपाधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे, अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर, अतिक्रमण निर्मूलन प्रमुख आदित्य बल्लाळ आदि उपस्थित होते.

यावेळी बोलताना जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी गणेशोत्सवाची परंपरा आणि पवित्र जपण्याचे आवाहन करत उत्सवाच्या माध्यमातून 'नशा मुक्त अहिल्यानगर' अशा संदेश देण्यासाठी प्रबोधनात्मक उपक्रम राबवावे असे सुचवले. पोलीस अधीक्षक सुदर्शन म्हणाले साऊंड सिस्टीम च्या वापराबाबत सर्व मंडळांनी नियमांचे पालन करावे सर्वोच्च न्यायालयाचे आदेशानुसार प्रशासनाला कारवाई करावी लागते कोणत्याही मंडळाविरुद्ध प्रशासनाचा वैयक्तिक द्वेष नाही. मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सहकार्य करून ध्वनी प्रदूषण मुक्त गणेशोत्सव साजरा करावा. यावेळी भिंगार मधील गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनाही पदाधिकाऱ्यांनी सूचना मांडल्या. या बैठकीला भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, नगरसेवक निखिल वारे, रवींद्र बारस्कर, भाजपाचे पुष्कर कुलकर्णी, अशोक कानडे, संजय झिंजे, योगेश काळे, कमलेश जंजाळे, शिवदत्त पांढरे, दिगंबर गेट्ट्यांल, रोहन गाडळकर, मुकुल गंधे यांनी सूचना केल्या. यावेळी बोलताना शिवसेनेचे विक्रम राठोड म्हणाले गणेशोत्सव काळात आणि मिरवणुकी दरम्यान डीजे मधील प्लाझ्मा व लेजर वापराला जाणार नाही.

मात्र नियम भंग झाल्यास पोलिसांनी मंडळाची संपूर्ण सिडी किंवा डॉल्बी साऊंड सिस्टिम जप्त करू नये अशी मागणी केली. पोलिसांकडून अनेकदा साऊंड सिस्टिम पुरविणाऱ्यांचे सर्व साहित्य जप्त केले जाते. त्यामुळे संबंधित व्यावसायिकाचे मोठे आर्थिक नुकसान होते अशी सूचना मांडली. यावेळी पोलीस अधीक्षक सुदर्शन म्हणाले ध्वनी प्रदूषणाबाबत नियम सर्वांनी पाळावेत. त्याचबरोबर महापालिका प्रशासनाने श्री विसर्जन मार्गावरील गणेश विसर्जन मार्गावरील खड्डे बुजवावीत तसेच शौचालयाची व्यवस्था करावी अशी सूचना गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी केली. त्याचप्रमाणे भाजपचे शहराध्यक्ष अनिल मोहिते म्हणाले महावितरण कडून विजेच्या तारा आणि सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना होत नाहीत. वर्षभरात विजेशी संबंधित पाच दुर्घटना घडल्या असून गणेशोत्सवात अशा प्रकारचे दुर्घटना घडल्यास महावितरण ला जबाबदार धरण्यात यावे.

## दारुच्या नशेत तरुणावर कुंडीने जीवघेणा हल्ला

**अहिल्यानगर :** दारूच्या नशेत विनाकारण शिवीगाळ करणाऱ्यांना समजावून सांगायला गेलेल्या तरुणाच्या डोक्यात झाडाची कुंडी घालून त्याला गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना भिंगार येथील महेशनगर भागात घडली. याप्रकरणी सुरज देविदास बनसोडे (रा. पालवे किराणा शेजारी, भिंगार) याच्या फिर्यादीवरून कॅम्प पोलीस ठाण्यात ठाकूर महेश्वर सिंग (रा. महेशनगर, भिंगार) आणि सोमेन विश्वास (रा. ए. अँड. ई. आर्मी कॅम्प, अहिल्यानगर) या दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यावेळी दारूच्या नशेत असलेल्या आरोपींनी त्यांना रस्त्यात अडवून विनाकारण अश्लील शिवीगाळ सुरू केली. हा प्रकार पाहून फिर्यादी सुरज बनसोडे आणि त्याचा भाऊ सुमित बनसोडे हे मध्यस्थी करण्यासाठी गेले. या हल्ल्यात सुमित गंभीर जखमी झाला असून त्याला उपचारासाठी तातडीने शासकीय रुणालयात दाखल करण्यात आले आहे.

## जुन्या पेन्शनसाठी शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा एल्गार

### ५ सप्टेंबरला जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** जुन्या पेन्शन योजनेपासून वंचित ठेवण्यात आल्याच्या निषेधार्थ राज्यातील माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचे रणशिंग फुंकले आहे. मंगळवारपासून (ता. १ सप्टेंबर) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती बांधून शासनाच्या धोरणाचा निषेध नोंदविण्यास सुरुवात केली आहे. १ ते ४ सप्टेंबर या कालावधीत काळ्या फिती बांधून नियमित शैक्षणिक कामकाज सुरू ठेवत हे आंदोलन करण्यात येणार आहे.

यानंतर शिक्षक दिनाचे औचित्य साधून ५ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. जुन्या पेन्शन योजनेच्या मागणीबाबत शासनाने अद्याप ठोस निर्णय घेतला नसल्याने आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शासनाने मागणीची दखल घेऊन सकारात्मक निर्णय न घेतल्यास २८ सप्टेंबरपासून मुंबईतील आझाद मैदानावर सहकुटुंब आंदोलन छेडण्यात येईल, तसेच आमरण उपोषण करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. जुनी पेन्शन कोअर कमिटीचे राज्य सचिव तथा जुन्या पेन्शन योजना समन्वय संघाचे राज्य समन्वयक महेंद्र हिंगे आणि राज्य समन्वयक सुनील भोर यांनी ही माहिती दिली.

१ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुन्या पेन्शन योजनेचा लाभ मिळावा, ही मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. जुन्या पेन्शन योजनेचा लाभ मिळावा यासाठी संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यापूर्वीही विविध आंदोलने, निवेदने आणि मोर्चांच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, वारंवार आंदोलने करूनही शासनाकडून या प्रश्नावर ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही, असा आरोप जुन्या पेन्शन योजना समन्वय संघाने केला आहे. त्यामुळे आता आंदोलनाचा टप्पा अधिक तीव्र करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील या आंदोलनासाठी महेंद्र हिंगे, सुनील भोर, देविदास खेडकर, दिलीप डोंगरे, संजय वाळे, संजय इघे, राज जाधव, सुनील दानवे, संजय भुसारी, राजू पठाण, जाकीर सय्यद, मुकुंद अंचवले, छबुराव फुंदे, बद्रीनाथ शिंदे, सुदाम दळवी, बाबासाहेब शिंदे, भाऊसाहेब शिंदे, अजित वडवकर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत. या आंदोलनाला विविध शिक्षक संघटनांनीही पाठिंबा जाहीर केला आहे. सुनील पंडित, आप्पासाहेब शिंदे, बाबासाहेब बोडखे आप्पासाहेब जगताप यांनी आंदोलनाला पाठिंबा दिला आहे.

## सार्वजनिक उत्सवांमध्ये डीजे ऐवजी ब्लूटूथ हेडफोनचा वापर व्हावा : मुख्यमंत्र्यांकडे मागणी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** सार्वजनिक उत्सव मिरवणुकांमध्ये जल्लोष करण्यासाठी डीजे ध्वनीक्षेपकांऐवजी ब्लूटूथ हेडफोन, वायरलेस एअर बडस् असे अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित पर्सनल ऑडिओ डिवाइस वापरण्यात यावेत, या नाविन्यपूर्ण व शांततापूर्ण उत्सव संकल्पनेबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी मागणी हरिभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभय ललवाणी यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात श्री ललवाणी यांनी म्हटले आहे की, आपले महाराष्ट्र राज्य हे सण, उत्सव व धार्मिक परंपरा असलेले राज्य आहे.

विविध सार्वजनिक उत्सव व सणानिमित्त नागरिक मोठ्या उत्साहाने एकत्र येतात. मात्र अलीकडील काळात सार्वजनिक उत्सव मिरवणुकांमध्ये कार्यकर्ते जल्लोष करण्यासाठी मोठ्या कर्कश्य व असह्य आवाजाचे डीजे डॉल्बी ध्वनिक्षेपक वापरतात.

या कर्कश आवाजातून सहभागी कार्यकर्त्यांना आनंद व उत्साह मिळत असला तरी नजीकच्या ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, रुग्ण व इतर नागरिकांना या कर्कश ध्वनी प्रदूषणाचा मोठा त्रास सहन करावा लागतो. असह्य आवाजामुळे अनेकदा जीवित हानी झालेली आहे.

या सर्व बाबींचा विचार करता ब्लूटूथ हेडफोन वायरलेस - इयर बडस् व पर्सनल ऑडिओ डिवाइस हा अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित शांततापूर्ण उत्सव साजरा करण्यासाठी उत्तम पर्याय ठरू शकतो, असे निवेदनात म्हटले आहे.

## मतमाऊली हरेगाव यात्रेसाठी अहिल्यानगरमधून १० सप्टेंबरला पदयात्रा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** सालाबादप्रमाणे यंदाही मतमाऊली हरेगाव यात्रेनिमित्त अहिल्यानगर शहरातून भाविक पदयात्रेने हरेगाव (ता. श्रीरामपूर) येथे जाणार आहेत. गुरुवार, दि. १० सप्टेंबर रोजी सकाळी ६ वाजता बोल्हेगाव येथून या भव्य पदयात्रेचे प्रस्थान होणार असून, शुक्रवार रोजी राहुरी येथून श्रीरामपूरच्या दिशेने पदयात्रा पुढे मार्गस्थ होणार आहे. शनिवार रोजी हरेगाव वेस ते चर्च अशी मिरवणूक काढण्यात येणार आहे. दि. १२ व १३ सप्टेंबर रोजी मतमाऊली यात्रा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडणार असल्याची माहिती पद यात्रेचे प्रमुख प्रा. पंकज लोखंडे यांनी दिली.

ख्रिस्ती धर्मगुरू येशू संधिय, डायसेस, रेव्ह. आबा वाघमारे, रेव्ह. प्रकाश राऊत, रेव्ह. संपत भोसले यांच्या आशीर्वादाने मतमाऊली पदयात्रा कमिटीच्या वतीने या यात्रेला प्रारंभ होणार आहे. श्रद्धा, भक्ती आणि सामाजिक एकतेचा संदेश देणाऱ्या या पदयात्रेत अहिल्यानगर शहरासह परिसरातील मोठ्या संख्येने ख्रिस्ती समाजबांधवांसह इतर समाजबांधव देखील सहभागी होणार आहे.

ही पदयात्रा आ. संग्राम जगताप, नगरसेवक कुमारसिंह वाकळे, नगरसेवक सुरेश बनसोडे, माजी पोलिस निरिक्षक सुहासकुमार देठे, पा. प्रशांत चक्रनारायण, अनिल कसबे, कार्यवाहक अभिमन्यु साळवे व राजेश फुलपगार, यात्रा कमिटीचे अध्यक्ष जॉन्सन लोखंडे, उपाध्यक्ष विशाल गायकवाड, सचिव राजू डोईफोडे, सहसचिव बाळासाहेब पाटोळे, कार्याध्यक्ष अमित लोखंडे, सहकार्याध्यक्ष निलेश साळवे, संघटक सनी भाकरे, सदस्य शरद वाकडे, अनिल डोईफोडे, जुबेर सय्यद, महादेव माने यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली आहे.

## शिक्षक आ. किशोर दराडे यांचा सोमवारी शिक्षक दरबार

### पुणे विभागीय उपसंचालकांची राहणार उपस्थिती

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्ह्यातील मुख्याध्यापक, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत नाशिक विभागाचे शिक्षक आमदार किशोर दराडे यांच्या उपस्थितीत शिक्षक दरबार होणार आहे. ही विशेष बैठक सोमवार दि.७ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता जिल्हा परिषदेच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात पार पडणार आहे. या बैठकीसाठी पुणे विभागीय उपसंचालक यांची प्रमुख उपस्थिती राहणार असल्याची माहिती त्यांचे स्वीय सहाय्यक हरीष मुंढे व वैभव सांगळे यांनी दिली.

या बैठकीस माध्यमिक शिक्षणाधिकारी, वेतन अधीक्षक तसेच लेखाधिकारी शिक्षण विभाग उपस्थित राहणार असून, शिक्षण विभागाशी संबंधित प्रलंबित कामांबाबत थेट चर्चा केली जाणार आहे. जिल्ह्यातील ज्या मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची विविध प्रकरणे प्रलंबित असतील त्यांनी आवश्यक कागदपत्रांसह बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

तसेच संबंधितांनी आपल्या समस्या, तक्रारी अथवा प्रश्न बैठकीपूर्वी व्हॉट्सपद्वारे पाठवावेत, असेही सांगण्यात आले आहे. स्वीय सहाय्यक हरीष मुंढे यांच्या व्हॉट्सप क्रमांक ७५८८०१४००५ आणि ८२७५५२२५२६ वर प्रश्न पाठविण्याचे सांगण्यात आले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर सर्व संघटनांच्या पदाधिकारी व शिक्षक सदस्यांनी बैठकीस उपस्थित राहून विविध प्रश्न मांडावेत, असे आमदार दराडे यांच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. या बैठकीमुळे शिक्षण विभागातील रखडलेली प्रकरणे, वेतन, सेवा विषयक अडचणी तसेच प्रशासकीय प्रश्न मार्गी लावण्याचे काम केले जाणार आहे.

# सीना नदीतील अतिक्रमणाविरोधात नेप्ती ग्रामस्थांचा एल्गार

### रस्ता रोकोने प्रशासनाला घेरले!

### कारवाई न झाल्यास सामूहिक आत्मदहनाचा इशारा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** नगर तालुक्यातील नेप्ती परिसरातील चांदपेर वस्ती येथे सीना नदीच्या पात्रात सुरू असलेल्या कथित अनधिकृत बांधकाम व अतिक्रमणाच्या प्रश्नावरून नेप्ती ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. अतिक्रमण तातडीने हटवावे, या मागणीसाठी बुधवार, २ सप्टेंबर रोजी छत्रपती इंजिनिअरिंग कॉलेजसमोर ग्रामस्थांनी रस्ता रोको आंदोलन केले. महिला, पुरुष, वृद्ध तसेच ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले होते.

सीना नदीपात्रातील जामगाव नाल्यावरील अतिक्रमणामुळे नदीच्या नैसर्गिक प्रवाहाला अडथळा निर्माण होत असल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. या अतिक्रमणाविरोधात वारंवार मागणी करूनही ठोस कारवाई होत नसल्याने अखेर ग्रामस्थांनी रस्त्यावर उतरून प्रशासनाचे लक्ष वेधले. आंदोलनाची माहिती मिळताच नगर तालुका पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी ग्रामस्थांची समजूत काढत आंदोलन शांत करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर तहसील कार्यालयाच्या माध्यमातून ग्रामस्थांना लेखी आश्वासन देण्यात आले.

८ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकाऱ्यांसमोर ग्रामस्थांची बैठक घेण्यात येईल आणि सीना नदीपात्रातील अतिक्रमणाच्या प्रश्नावर तोडगा काढून अतिक्रमण हटविण्याबाबत कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन देण्यात आले. या लेखी आश्वासनानंतर ग्रामस्थांनी रस्ता रोको आंदोलन मागे घेतले.

मात्र, प्रशासनाला ८ सप्टेंबरची मुदत देण्यात आली असून त्यानंतरही ठोस कारवाई न झाल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. सीना नदीपात्रातील जामगाव नाल्यावरील अतिक्रमण तातडीने हटवा; अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सामूहिक आत्मदहन करू, असा गंभीर इशारा नेप्ती ग्रामस्थांनी प्रशासनाला दिला आहे. आता



८ सप्टेंबरच्या बैठकीत प्रशासन काय निर्णय घेते आणि सीना नदीपात्रातील अतिक्रमणावर प्रत्यक्ष कारवाई कधी होते, याकडे नेप्ती परिसरातील ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

## दखल

### आळंदीत डीजे, लेझर-प्लाझ्मावर बंदी

**आळंदी :** आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आळंदी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील गणेशोत्सव मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. गणेशोत्सव शांततेत व शिस्तबद्ध वातावरणात साजरा करण्यासाठी पोलिस प्रशासनाने मंडळांना विविध सूचना दिल्या.

चाकण विभागाचे सहायक पोलिस आयुक्त योगेश रांजणकर आणि आळंदी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक बी. एस. नरके यांनी मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. गणेशोत्सवासाठी पोलिस व प्रशासनाची आवश्यक परवानगी घेणे बंधनकारक असून, उत्सवादरम्यान डीजेचा वापर करू नये. तसेच मिरवणुकीत लेझर व प्लाझ्माचा वापर करण्यास बंदी असल्याचे स्पष्ट करण्यात आले.गणेश दर्शनासाठी महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र रांगा कराव्यात, मंडप परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत आणि मंडपात जुगार व मद्यपान होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशा सूचना देण्यात आल्या. चाकण चौक, वडगाव रोड व मरकळ रोडवरून येणाऱ्या विसर्जन मिरवणुका चावडी चौकातून पोलिसांच्या सूचनेनुसार मार्गस्थ करण्यात येतील.आळंदी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांनी इंद्रायणी नदीत गणेशमूर्ती विसर्जनास बंदी असल्याचे सांगितले. नगरपरिषदेच्या वतीने वडगाव रोडवरील पार्किंगच्या ठिकाणी कृत्रिम तलाव उभारण्यात येणार असून, त्यातच मूर्तींचे विसर्जन करावे, असे आवाहन करण्यात आले. निर्माल्य नदीत किंवा रस्त्यावर न टाकता निर्माल्य कुंडात टाकावे. तसेच विसर्जन मिरवणुकीच्या मार्गावरील खड्डे बुजविण्यात येतील, अशी माहिती देण्यात आली.बैठकीस विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते.

### मोरया पुरस्कारात आळंदीच्या जय गणेश प्रतिष्ठानला द्वितीय क्रमांक

**आळंदी :** पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या वतीने आयोजित 'मोरया पुरस्कार-२०२५' स्पर्धेत परिमंडळ-३ स्तरावर आळंदी येथील जय गणेश प्रतिष्ठानला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. मंडळाच्या वतीने यंदा सादर करण्यात आलेला 'श्री म हालक्ष्मी (अंबाबाई) मंदिर' हा आकर्षक देखावा, तसेच गणेशोत्सव काळात राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची दखल घेत हा पुरस्कार देण्यात आला.



आळंदीचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, माजी नगरसेवक प्रकाश कुऱ्हाडे व उद्योजक चेतन कुऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यक्ष सागर उर्फ गोविंद कुऱ्हाडे यांच्या नेतृत्वाखाली मंडळाने गणेशोत्सवाचे आयोजन केले होते. देखावा पाहण्यासाठी येणाऱ्या भाविकांसाठी प्रवेश व बाहेर जाण्यास स्वतंत्र मार्गांची व्यवस्था करण्यात आली होती. दिशादर्शक फलक, सीसीटीव्ही यंत्रणा तसेच वाहतुकीला अडथळा होणार नाही, अशा पद्धतीने गणेशमूर्तीची स्थापना करण्यात आली होती. मंडळाच्या वतीने गरीब व बेवारस व्यक्तींच्या अंत्यविधीसाठी आर्थिक मदत केली जाते. तसेच देखावा पाहण्यासाठी येणाऱ्या भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. गणेश विसर्जन मिरवणुकीत 'घराचे घरपण हरवलं' या नाटकाचे सादरीकरण करण्यात आले. गुलालमुक्त व शिस्तबद्ध पद्धतीने प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करत विसर्जन मिरवणूक पार पडली.पुरस्कार जय गणेश प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा नगरसेवक सागर उर्फ गोविंद कुऱ्हाडे व मंडळाच्या सर्व सभासदांनी स्वीकारला. यावेळी पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे, आळंदी पोलिस ठाण्याचे भीमाजी नरके, मच्छिंद्र शेंडे, परीक्षक अजित वडगावकर आदी उपस्थित होते.

### ई-चलन थकीत असल्यास आरटीओ सेवा बंद; वाहतूकदारांचा विरोध

**पुणे :** वाहनावरील प्रलंबित ई-चलनाचा दंड भरल्याशिवाय प्रादेशिक परिवहन कार्यालयातील (आरटीओ) संबंधित कामकाज न करण्याच्या निर्णयाला राज्यातील वाहतूकदारांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. १ सप्टेंबरपासून या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आल्याचा दावा महाराष्ट्र राज्य माल व प्रवासी वाहतूक संघटनेचे अध्यक्ष डॉ. बाबा शिंदे यांनी केला.

ई-चलनाचा दंड थकीत असल्यास वाहन हस्तांतरण, नोंदणी, परवाना तसेच अन्य आरटीओ सेवा रोखल्या जाणार असल्याने लाखो वाहनधारकांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागणार असल्याचे संघटनेने म्हटले आहे. गेल्या दोन-तीन वर्षांपासून चुकीच्या पद्धतीने आकारण्यात आलेल्या ई-चलनांबाबत वाहनधारकांमध्ये नाराजी असून, अशी चलने रद्द करण्याची मागणी सातत्याने करण्यात येत आहे.

चुकीची व त्रुटीपूर्ण ई-चलने आधी तपासून रद्द करावीत आणि त्यानंतरच योग्य चलनांच्या दंडाची वसुली करावी, अशी मागणी डॉ. शिंदे यांनी केली. सरकारची एकीकडे चुकीची चलने रद्द करण्याची भूमिका आणि दुसरीकडे दंड भरण्याची सक्ती ही विसंगत असल्याचे त्यांनी सांगितले.

सरकारने हा निर्णय तातडीने मागे न घेतल्यास राज्यस्तरीय आंदोलन छेडण्याचा इशारा महाराष्ट्र राज्य माल व प्रवासी वाहतूक संघटनेने दिला आहे. खासगी तसेच व्यावसायिक वाहनधारकांनी या निर्णयाविरोधात एकत्र येण्याचे आवाहनही संघटनेने केले आहे.

# उद्योजकांच्या तक्रारींसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात कक्ष

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** जिल्ह्यातील उद्योजकांच्या शासकीय व प्रशासकीय समस्या, तक्रारी आणि प्रलंबित प्रकरणांचे कालबद्ध पद्धतीने निराकरण करण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालयात उद्योग तक्रार निवारण कक्ष आणि मैत्री सेल कार्यान्वित करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली या उपक्रमाची पहिली बैठक घेण्यात आली.



उद्योजकांच्या तक्रारींचा आढावा घेताना जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम व संबंधित विभागांचे अधिकारी.

बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांच्यासह उद्योग, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, कामगार, ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क, वैधमापन शास्त्र, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पाटबंधारे आणि पर्यटन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत विविध शासकीय विभागांकडे प्रलंबित असलेल्या उद्योजकांच्या १३४ तक्रारींचा विभागनिहाय आढावा घेण्यात आला. यामध्ये औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाची १, उद्योग संचालनालयाच्या २, ऊर्जा विभागाच्या ३, राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या ६, वैधमापन शास्त्र विभागाच्या १३ आणि महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाशी संबंधित १०९ तक्रारींचा समावेश आहे.

उद्योजकांना विविध विभागांमध्ये वारंवार पाठपुरावा करावा लागू नये, यासाठी मैत्री सेलमार्फत संबंधित विभागांमध्ये समन्वय साधून तक्रारींच्या कार्यवाहीचा नियमित पाठपुरावा करण्यात येणार आहे. सेलच्या बैठका दर पंधरा दिवसांनी घेण्यात येणार आहेत.

तसेच उद्योजकांच्या समस्या थेट ऐकून घेण्यासाठी दर महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष बैठक आयोजित केली जाणार आहे. या बैठकीस संबंधित औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी आणि संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

या उपक्रमामुळे उद्योजकांना जिल्हास्तरावर 'एकाच ठिकाणी समन्वय व सुविधा' उपलब्ध होऊन प्रलंबित प्रकरणांचा जलद निपटारा होण्यास मदत होणार आहे. व्यवसाय सुलभता अधिक प्रभावी करण्यासाठी औद्योगिक संघटनांनी या सुविधेचा सक्रियपणे उपयोग करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले.तक्रारींसाठी उद्योग तक्रार निवारण कक्षाशी ०२०-२६१३००९७ या दूरध्वनी क्रमांकावर किंवा collector.punemaharashtra.gov.in या ई-मेलवर संपर्क साधता येणार आहे.

# रखडलेल्या कामासाठी पारगाव ग्रामस्थांचा चौफुला-शिरूर महामार्गावर ठिय्या

## चौफुला-न्हावरा मार्गावरील अपूर्ण कामांमुळे अपघातांचा धोका

### प्रशासनाच्या आश्वासनानंतर आंदोलन मागे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पारगाव (ता. दौंड) :** चौफुला ते न्हावरा या सुमारे २५ किलोमीटर लांबीच्या महामार्गाचे काम मंजूर होऊनही अनेक ठिकाणी अपूर्ण राहिल्याने पारगाव ग्रामस्थांनी मंगळवारी चौफुला-शिरूर महामार्गावर ठिय्या आंदोलन केले. सुमारे अर्धा तास सुरू असलेल्या आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली. दोन्ही बाजूंना सुमारे चार किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.




चौफुला ते न्हावरा या सुमारे २५ किलोमीटर लांबीच्या महामार्गाचे काम मंजूर होऊनही अनेक ठिकाणी अपूर्ण राहिल्याने पारगाव ग्रामस्थांनी मंगळवारी चौफुला-शिरूर महामार्गावर ठिय्या आंदोलन केले.

या महामार्गासाठी सुमारे २५० कोटी रुपयांचा निधी मंजूर असून, कागदोपत्री काम पूर्ण दाखविण्यात आले असल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. प्रत्यक्षात ठिकठिकाणी कामे अर्धवट असल्याने वाहनचालक आणि स्थानिक नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, या मार्गावर आतापर्यंत सुमारे ४० जणांचा अपघाती मृत्यू झाला आहे. अपूर्ण काम ांबाबत अनेकदा लेखी तक्रारी करूनही कार्यवाही न झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप आहे. महामार्गालगतच्या गावांसाठी दिशादर्शक फलक बसविणे, रबर स्ट्रिप बसविणे, चौकांमध्ये स्ट्रीटलाईटची व्यवस्था करणे, रस्त्याच्या मध्यभागी डिव्हायडर उभारून त्यावर स्ट्रीटलाईट बसविणे, तसेच गटरलाईनची अपूर्ण कामे पूर्ण करणे आदी मागण्या ग्रामस्थांनी केल्या.

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर यवत पोलीस आणि महामार्ग बारामती फाटा पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. राष्ट्रीय महामार्ग, पुणे विभागाचे शाखा अभियंता किरण गोडसे यांनी आंदोलकांशी चर्चा केली. संबंधित सर्व विभागांची बैठक घेऊन प्रलंबित कामांबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आल्यानंतर ग्रामस्थांनी आंदोलन म ागे घेतले.आंदोलनाला सयाजीत ताकवणे, पारगावचे सरपंच सुभाष बोत्रे, संभाजी ताकवणे आणि रमेश बोत्रे यांनी संबोधित केले. आंदोलनात तरुणांसह ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### जिल्ह्यात प्राणी क्लेश रोखण्यासाठी प्रभावी नियोजन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** प्राणी क्रूरतेच्या घटनांना आळा घालण्यासाठी तसेच प्राप्त तक्रारींचे वेळेत आणि नियमानुसार निवारण करण्यासाठी जिल्हास्तरावर प्रभावी नियोजन करण्याचा निर्णय जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक समितीच्या बैठकीत घेण्यात आला. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात ही बैठक झाली.

बैठकीस पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. राजेशकुमार वासनिक, पशुसंवर्धन विभागाचे सहायक आयुक्त विष्णु गर्जे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.पोलिस विभाग, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत, ग्रामपंचायत तसेच शासकीय व निमशासकीय संस्थांनी प्राणी कल्याणाच्या विषयावर सम न्वयाने काम करावे. प्राणी क्रूरता, गोवंश संरक्षण, कत्तलखाने आणि जनावरांची वाहतूक यासंदर्भातील तक्रारींवर निश्चित कार्यपद्धतीनुसार (SOP) कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

# गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार प्रेरणादायी उपक्रम : प्राचार्य संजय चाकणे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** अहमदनगर जिल्हा मित्र मंडळ (पब्लिक ट्रस्ट), पुणे यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थी तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार समारंभ पुण्यातील दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) येथे रविवार (ता. ३०) आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून टिकाराम जगन्नाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. संजय चाकणे यांनी मंडळाच्या उपक्रमाचे कौतुक केले.




पुणे येथे अहमदनगर जिल्हा मित्र मंडळाच्या वतीने मार्गदर्शन करताना डॉ चाकणे

गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार हा विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणारा आणि प्रेरणा देणारा उपक्रम आहे. यामुळे विद्यार्थ्यांना यशस्वी म ान्यवरांचे विचार ऐकण्याची संधी मिळते. विद्यार्थ्यांनी अभ्यासावर लक्ष केंद्रित करून विविध क्षेत्रांत प्रामाणिकपणे कार्य करावे आणि देशाचे भवितव्य उज्ज्वल करण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन प्राचार्य चाकणे यांनी केले.

अहमदनगर जिल्हा मित्र मंडळाचे अध्यक्ष साहेबराव खामकर यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. संस्थेच्या वतीने त्रैमासिक सुरू करण्यात येणार असून, संस्थेच्या नावात 'अहमदनगर'ऐवजी 'अहिल्यानगर' असा बदल करण्यासाठीचा बदल अहवाल धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे सादर केल्याचे त्यांनी सांगितले.

मंडळाचे माजी अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य सहकार विभागाचे माजी अपर आयुक्त भास्करराव शेळके यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला. मंडळाचे सदस्य रावसाहेब पवार यांनी पुणे येथे संस्थेच्या म ाध्यमातून वसतिगृह सुरू करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमात इयत्ता दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर, पीएचडी तसेच स्पर्धा परीक्षेत यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा आणि उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास नगर जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष शकील शेख, पारनेर तालुका मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष हौसाराम घोडके, सेवानिवृत्त प्रॉव्हिडंट फंड निरीक्षक भाऊसाहेब काकडे यांच्यासह संस्थेचे सभासद, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. मंडळाचे कोषाध्यक्ष साहेबराव मोरे यांनी आभार मानले. मानद सचिव प्रा. सुनील राजेनिंबाळकर यांनी सूत्रसंचालन केले.

# आदिवासी क्षेत्रातील रिक्त पदांची भरती प्रक्रिया सहा महिन्यांत करावी : मुख्यमंत्री फडणवीस

## अधिसंख्य पदांवरील कर्मचाऱ्यांची माहिती दोन आठवड्यांत सादर करण्याचे निर्देश

**मुंबई/ पुणे :** विविध शासकीय विभागांमध्ये अधिसंख्य पदांवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची तसेच त्या अनुषंगाने उपलब्ध मूळ रिक्त पदांची सविस्तर माहिती दोन आठवड्यांच्या आत सादर करावी. आदिवासी क्षेत्रातील रिक्त पदांची भरती प्रक्रिया सहा महिन्यांच्या आत करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मंत्रालय येथे आदिवासी क्षेत्रातील (पेसा) रिक्त पदांबाबत बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, मंत्रिमंडळातील सदस्य, मुख्य सचिव राजेश अग्रवाल सर्व विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार संबंधित कर्मचाऱ्यांना मूळ पदांवरून कार्यमुक्त करण्यात आले. मात्र, अनेक कर्मचाऱ्यांनी दीर्घकाळ सेवा बजावल्याने मानवतावादी दृष्टिकोनातून त्यांना अधिसंख्य पदांवर सामावून घेण्यात आले.

प्रत्येक विभागाने आपल्या विभागात अधिसंख्य पदांवर किती कर्मचारी कार्यरत आहेत, त्यापैकी किती कर्मचारी निवृत्त झाले आहेत आणि त्या अनुषंगाने रिक्त मूळ पदे, याची अचूक माहिती तातडीने संकलित करावी, असे निर्देश सर्व जिल्हाधिकाऱ्यांना मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. ही सर्व माहिती मुख्य सचिव कार्यालयाकडे सादर करण्यात येणार



असून, त्यानंतर संबंधित विभागांनी रिक्त पदांवरील भरतीसाठी आवश्यक व्यवस्था उभारावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या संदर्भातील कालमर्यादा कोणत्याही परिस्थितीत बदलली जाणार नसून, सर्व संबंधित विभागांनी निश्चित वेळेत माहिती सादर करून भरती प्रक्रियेची तयारी पूर्ण करावी, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

बैठकीत अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील नियुक्त्यांच्या पडताळणी प्रक्रियेबाबत चर्चा करण्यात आली. २०१५ मध्ये करण्यात आलेल्या आढाव्यानुसार काही कर्मचाऱ्यांचे जात वैधता प्रम ाणपत्र सादर झाले नव्हते. त्यानंतर २०१९ मध्ये करण्यात आलेल्या पडताळणीत वैधता प्रमाणपत्र नसलेल्या सुमारे ६,८६० कर्मचाऱ्यांचा प्रश्न समोर आला. यापैकी १३४६ पदे भरलेली आहेत.

# विधी अधिकारी पदाकरिता २१ सप्टेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** कृषी विभागाच्या पुणे विभागांतर्गत पुणे, सोलापूर व अहिल्यानगर जिल्ह्यातील न्यायालयीन प्रकरणाच्या कामकाजाकरिता एक विधिज्ञ किंवा विधी अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात येणार असून पात्र उमेदवारांना २१ सप्टेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना (खंडीत कालावधी) आणि गोपीनाथ मुंडे शेतकरी सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेच्या न्यायालयीन प्रकरणाच्या कामकाजाकरिता ही नेमणूक करण्यात येणार आहे. अर्जदार वकिली परवाना असलेला बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र व गोवा मध्ये नोंदणीकृत वकील असावा. उच्च न्यायालय खंडपीठ, जिल्हा व राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग येथे किमान १० वर्षांचा कामकाजाचा अनुभव असावा. अपघात विमा, नागरी दावे, नुकसानभरपाई व तत्सम प्रकरणांचा अनुभव असावा. शासकीय किंवा सार्वजनिक संस्थांच्यावतीने न्यायालयीन प्रकरणे हाताळल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येणार आहे.

या पदाची नेमणूक महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलने ठरविलेल्या दरपत्रकानुसार केली जाणार आहे. बार कौन्सिलच्या दरानुसार राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडील प्रति खटल्यानुसार ५० हजार रुपये तसेच जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाकडील प्रति केस १० हजार रुपये इतके मानधन देण्यात येणार आहे. हे मानधन खटल्याचे वाचन, अर्ज तयार करणे, प्रतिवादची तयारी, इतर शुल्क, तारखांना उपस्थिती, खटल्याच्या अनुषंगीक इतर बाबीसह देण्यात येईल. अर्ज विभागीय कृषी सहसंचालक कार्यालय, पुणे विभाग, पद्मश्री सभागृह, २ रा मजला, कृषी आयुक्तालय मध्यवर्ती इमारत, पुणे या पत्त्यावर करावा. अपूर्ण अर्ज, अपात्र उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

पात्रतेनुसार व आवश्यकतेनुसारच अंतिम नेमणूक केली जाणार आहे. अर्ज स्वीकारणे किवा नाकारण्याचा अधिकार विभागाला राहील, असे विभागीय कृषी सह संचालक बाबासाहेब जेजुरकर यांनी प्रसद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

**■ अर्जासह अर्जदाराचे संपूर्ण नाव, पत्ता व संपर्क तपशील, वकिली परवाना क्रमांक व प्रमाणपत्राची प्रत, शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे, न्यायालयीन अनुभवाचे तपशील विशेषत: अपघात विमा, नागरी दावे विषयक, शासकीय कामकाजाचा अनुभव असल्यास त्याची प्रमाणपत्रे, पारपत्र आकाराचे छायाचित्र यांच्यासह शासनाच्यावतीने दाखल केलेल्या न्यायालयीन प्रकरणांची यादी व शासनाच्या बाजूने निकाल लागलेल्या न्यायालयीन प्रकरणांची यादी सोबत जोडावी.**


### जाहीर आवाहन

सर्व लोकांना कळवण्यात येते की, शंकर भीमराव सूर्यवंशी मुक्काम पोस्ट सर्वे नंबर 98/2, प्लॉट नंबर सत्यकोटी बंगलो, गुरुविहार कॉलनी, नाशिक हायवे, भोसरी जिल्हा पुणे 411 039.

यांचे 7/4/2023 रोजी निधन झाले असून,त्यांच्या नावावर असणारे वाहन MH 14 HG 3048 truck 1214 model, MH 14 GD 8857 truck 1214 model, MH 12 LT 3021 truck 1613 model व MH 14 EX 3649 हि दोनचाकी. वरील सर्व वाहने त्यांचे एकमेव कायदेशीर वारसदार सुरेखा शंकर सूर्यवंशी यांच्या नावावर करण्यात येणार असून, याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास, पंधरा दिवसाच्या आत पिंपरी चिंचवड आरटीओ कार्यालयात कळवावे. अन्यथा कोणाची काही तक्रार नाही असे समजून, पुढील पूर्तता करण्यात येईल. याची नोंद घ्यावी .

दिनांक-02/9/2026

**श्रीमती सुरेखा शंकर सूर्यवंशी**
**मुक्काम पोस्ट भोसरी तालुका हवेली**
**जिल्हा पुणे 411 039**

## द • ख • ल

### दप्तरमुक्त शिक्षणाचा जय मल्हार विद्यालयात अनोखा उपक्रम



**नगर तालुका :** पिंपळावरोठा येथील जय मल्हार विद्यालयात आज दप्तर मुक्त शाळा हा अनोखा उपक्रम साजरा करण्यात आला.दप्तराचे ओझे कमी करून संस्कारक्षम तसेच इतर उपक्रमाद्वारे हा दिवस साजरा करण्यात आला.सुरुवातीला परिपाठ इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनीनी साजरा केला श्रावणी मुळे हिने उत्कृष्ट सूत्रसंचालन करून परिपाठाचे नियोजन केले.नंतर सर्व विद्यार्थ्यांनी विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना राख्या बांधल्या. वाचाल तर वाचाल या संकल्पनेप्रमाणे आठवी,नववी व दहावी विद्यार्थ्यांना विद्यार्थी ग्रंथालयातील पुस्तके वाचण्यासाठी दिले गेले.आठवीचे वर्गशिक्षक जरांगे सर, नववीचे वर्गशिक्षक केदारी सर व दहावीचे वर्गशिक्षक गरकळ सर यांनी वर्गानुसार पुस्तक वितरण करून विद्यार्थ्यांना पुस्तक वाचण्यासाठी दिले व त्यांचे वाचन घेतले. मुख्याध्यापक बी आर उंडे, जरांगे, गरकळ, केदारी, भगवान भांबरे, संतोष घुले, नारायण पुंडे, गौरी जगताप व छाया केदारे यांनी उत्कृष्ट नियोजन करून दप्तर मुक्त शाळा हा उपक्रम यशस्वीरित्या पूर्ण केला.

### दलित पँथरच्या शेवगाव तालुकाध्यक्षपदी साबळे तर उपाध्यक्षपदी निळ यांची निवड

**हातगाव :** विद्रोही कवी स्व. नामदेव ढसाळ यांनी स्थापन केलेल्या दलित पँथरच्या शेवगाव तालुकाध्यक्षपदी कांबी येथील वसंत बाबुराव साबळे यांची तर उपाध्यक्षपदी शेवगाव शहरातील शहादेव नागू निळ नुकतीच निवड झाली असून निवडीबाबतचे पत्र दलित पँथरचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ आढाव यांनी दोन्हीही नूतन पदाधिकाऱ्यांना नुकतेच राहुरी येथे पार पडलेल्या बैठकीमध्ये दिले आहे. साबळे व निळ हे दोघेही दलित चळवळीमध्ये गेली अनेक वर्षापासून एकनिष्ठेने काम करत असून साबळे यांनी अनेक वर्ष रिपब्लिकन सेनेचे शेवगाव तालुकाप्रमुख म्हणून काम केलेले आहे. दलित पँथरचे राष्ट्रीय अध्यक्ष यशवंत नडगम यांनी दिलेल्या आदेशान्वये आपली निवड करण्यात येत असून या निवडीच्या मध्यमातून आपण शेवगाव तालुक्यात संघटनेची वेग - वेगळ्या स्तरातून व्यापक स्वरूपाची बांधणी करून व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेल्या विचारांची संघटना मजबूत कशी होईल यासाठी प्रयत्न करावेत असे नियुक्तीच्या पत्रात जिल्हाध्यक्ष आढाव यांनी दोघांनाही दिलेल्या पत्रात म्हटले आहे.





### पत्रकार संघाच्या जिल्हाध्यक्षपदी अंकुश शिंदे

**श्रीगोंदा :** महाराष्ट्र राज्य पत्रकार महासंघाच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी श्रीगोंदा येथील पत्रकार तथा दैनिक दिव्य मराठीचे तालुका प्रतिनिधी अंकुश तुकाराम शिंदे यांची निवड करण्यात आली आहे. महासंघाचे राज्याध्यक्ष पत्रकार डॉ. समीर राजे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करून ही निवड जाहीर करण्यात आली. त्यांची नियुक्ती दि. १ सप्टेंबर २०२६ पासून अधिकृत करण्यात आली आहे. या निवडीसंदर्भात राज्याध्यक्ष डॉ. समीर राजे यांच्यासह विठ्ठल तांबे, सुरजकुमार बागडे, दीपक चव्हाण, राजेंद्र पवार, अरुणकुमार मोटे, विक्रम भोर, विजय मोटे, गिरीश वळवी, विजयकुमार हरिचंद्रा, सागर पवार, नवनाथ खिलारे आणि मोहंमद मुलानी आदी पदाधिकाऱ्यांनी बैठकीत चर्चा करून निवड जाहीर केली. या प्रसंगी पत्रकार दादा सोनवणे, शिवाजी साळुंके, अमोल बोरगे, प्रमोद आहेर आणि किशोर मचे उपस्थित होते. दरम्यान, कार्यसम्राट आमदार विक्रम पाचपुते, माजी आमदार राहुल जगताप, नगवडे कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे, घनशाम शेलार, बाबासाहेब भोस, मनोहर पोटे, नगराध्यक्षा सुनीता खेतमाळीस, टिळक भोस, स्मितल भैय्या वाबळे आणि प्रशांत दरेकर आदी मान्यवरांनी अंकुश शिंदे यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.



### शिवराज्याभिषेक सोहळ्या निमित्ताने रविवारी रक्तदान शिबीराचे आयोजन

**निघोज :** शिवराज्यभिषेक दिन सोहळ्या निमित्ताने शिवबा सोशल फाउंडेशन अंतर्गत शिवबा संघटना आयोजित निघोज येथे रविवार दि.६ सप्टेंबर रोजी मळगंगा मंदीराशेजारी भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती शिवबा संघटनेचे अध्यक्ष अनिल शेटे यांनी दिली आहे. सामाजिक उपक्रमाचे हे ७ वे वर्ष असून प्रत्येक वर्षी रक्तदान शिबीराच्या माध्यमातून शिवबा संघटना पदाधिकारी व सदस्य शिवराज्याभिषेक सोहळा कार्यक्रम निमित्ताने सामाजिक उपक्रमाचे आयोजन करीत असतात. गेली ६ वर्षात ६०० पेक्षा जास्त रक्तदात्यांनी रक्तदान शिबीरात सहभागी होऊन या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या आहेत. रक्तदान शिबीरात सहभागी झालेल्या रक्तदात्यास गरज लागेल त्या वेळी रक्त पिशवी उपलब्ध होणार आहे. आजपर्यंत २८० पेक्षा जास्त गरजूंना रक्त उपलब्ध करून देण्यात आले आहे. संपर्कासाठी राजूभाऊ लाळगे , रविशेठ रणसिंग, गणेश भुकन, निलेश वरखडे यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन शिवबा संघटनेने केले आहे. शिवबा सोशल फाउंडेशन, शिवबा संघटना, शिवबा दुर्गसंवर्धन परिवार, युवा सेना, सर्व मित्र परिवार व ग्रामस्थ तसेच पारनेर तालुका पत्रकार संघ यामध्ये सहभागी होणार असून रक्तदात्यांसाठी ट्रॅव्हलींग बॅग भेट देण्यात येणार असून या रक्तदान शिबीरात सहभागी होण्याचे आवाहन वरील संघटनांनी केले आहे.

### मनोज काशीद यांची जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड



**नगर तालुका :** केवळ पाठ्यपुस्तकातील शिक्षणापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणाऱ्या खोसपुरी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षक मनोज मच्छिंद्र काशीद यांच्या शैक्षणिक कार्याची जिल्हास्तरावर दखल घेण्यात आली आहे. जिल्हा परिषदेच्या वतीने देण्यात येणाऱ्या२०२५-२६ जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी जिल्ह्यातून निवड झालेल्या शिक्षकांमध्ये काशीद यांचा समावेश झाला आहे. जिल्ह्यामधून आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी १४ शिक्षकांची निवड करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसोबतच त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव मिळावा, वाचनाची गोडी निर्माण व्हावी, व्यवहारज्ञान वाढावे आणि भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्याचा आत्मविश्वास निर्माण व्हावा यासाठी शिक्षक मनोज काशीद यांनी शाळेत विविध उपक्रम प्रभावीपणे राबविले आहेत.

# माकडाचा उच्छाद अखेर थांबला!

## वनविभागाच्या पिंजऱ्यात जेरबंद!; जेऊरकरांनी सोडला सुटकेचा निःश्वास

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**नगर तालुका :** गेल्या काही दिवसांपासून जेऊरच्या मुख्य बाजारपेठेसह परिसरात उच्छाद मांडणाऱ्या माकडाला अखेर वनविभागाने पकडण्यात यश मिळविले. माकडाच्या वाढत्या उपद्रवामुळे नागरिक, दुकानदार तसेच शालेय विद्यार्थी त्रस्त झाले होते. वनविभागाच्या पथकाने माकडाला मंगळवारी (दि.१) पिंजऱ्यात जेरबंद केल्याने नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

जेऊर बाजारपेठ परिसरात वावरत असलेल्या माकडाकडून दुकानांमध्ये घुसून वस्तू पळविणे, खाद्यपदार्थांची नासधूस करणे तसेच नागरिकांना त्रास देण्याचे प्रकार सातत्याने घडत होते. दुकानांमधील खाद्यपदार्थ व इतर वस्तूंचे नुकसान होत असल्याने व्यापाऱ्यांमध्येही चिंता निर्माण झाली होती. शाळेच्या परिसरात आणि विद्यार्थ्यांच्या ये-जा करण्याच्या मार्गावरही माकडाचा वावर असल्याने पालकांमध्येही काळजीचे वातावरण होते.

या पार्श्वभूमीवर नागरिकांनी माकडाचा तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी वनविभागाकडे केली होती. त्यानुसार वनविभागाच्या वतीने जेऊर बाजारपेठ परिसरात माकडाला पकडण्यासाठी पिंजरा लावण्यात आला. बराच वेळ प्रतीक्षा आणि प्रयत्न केल्यानंतर अखेर माकड पिंजऱ्यात अडकले आणि वनविभागाच्या पथकाने त्याला सुरक्षितपणे ताब्यात घेतले. माकडाला पकडण्यासाठी वनपाल सचिन गायकवाड, वनरक्षक रंजना घोडके, वन कर्मचारी संजय सरोदे, वाहनचालक संदीप ठोंबरे, डॉ. कोठारी, डॉ. किरण कदम यांच्यासह प्राणिमित्र व स्थानिक नागरिकांनी प्रयत्न केले.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा १०६ वा जयंती उत्सव निघोज येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृहात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याची भव्य मिरवणूक निघोज यांनी येथील पेठेतून काढण्यात आली. आमदार काशिनाथ दाते यांनी यावेळी या मिरवणुकीत सहभागी होऊन साठे यांच्या पुतळ्यास अभिवादन करीत पुष्पहार अर्पण केला. यावेळी उपस्थीतांनी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयजयकाराच्या जोरदार घोषना दिल्या.

यावेळी दिपक लंके, अशोक लोखंडे, राजेंद्र आल्हाट, स्वाती चेतन साठे, दादाभाऊ लोखंडे, डॉ. प्रविण महाराज लोखंडे, ठकाराम लंके, शिवाजी लंके, ग्रामपंचायत सदस्या भावनाताई साळवे, सचिन लंके, जी एस महानगर बँकेचे अधिकारी लक्ष्मणराव साळवे, मोहन साळवे, शशिकांत साळवे, सचिन पंचरास, बाळासाहेब साळवे, कचरु साळवे, महेश साळवे, विशाल साळवे, सतिष साळवे, पत्रकार संपतराव वैरागर आदी तसेच महिला भगीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भटके विमुक्तांनी निवडणुकीत आपल्या मतांची दहशत निर्माण करावी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**राशीन :** आदिवासी भटके विमुक्तांनी देशाच्या आणि राज्याच्या निवडणुकीत आपल्या मतांची दहशत निर्माण केली पाहिजे तरच तुम्हाला तुमचे हक्क आणि अधिकार मिळतील आणि तुमच्या आर्थिक उन्नतीचा मार्ग मोकळा होईल असे प्रतिपादन वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांनी केले. भटके विमुक्त संयोजन समिती आणि भैरव क्रांती सेना यांच्या वतीने साने गुरुजी स्मारक सभागृहामध्ये आयोजित राज्यस्तरीय भटके विमुक्त परिषदेत अध्यक्षपदावरून ते बोलत होते.

ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या राज्यस्तरीय ॲड. डॉ. अरुण जाधव, विजय जाधव, डॉ. कैलास कदम, ॲड. मंगेश ससाने, ॲड. अरविंद तायडे, बाबुराव शिंदे, डॉ. दीपा राजमाने, उमाताई जाधव अंबरसिंग चव्हाण यांच्यासह वासुदेव, गोंधळी, बहुरूपी, रायरंद, मरीआईवाले, इत्यादी पारंपरिक लोक कलावंत भटक्या मुक्त जाती जमाती मधील विविध संघटनांचे कार्यकर्ते व प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होतेय.

यावेळी ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी १९९० साली काढलेल्या बिऱ्हाड मोर्चाची आठवण करून दिली. ते म्हणाले की त्यावेळी आम्हाला मुंबईच्या पोलीस आयुक्तांनी अडवले, त्यानंतर आमच्यावर गुन्हे दाखल झाले. आमच्या वकिलांनी याचिका दाखल केली आणि केवळ हॅबिट्युअल ॲक्ट नुसार कुणाला गुन्हेगार ठरवता येणार नाही असे ठणकावून सांगितले. त्यामुळे तो कायदा रद्द झाला. कोर्ट एखादा कायदा रद्द करू शकते. मात्र नवीन कायदे करायचे असतील तर ते विधानसभा, विधानपरिषद, राज्यसभा, लोकसभा आणि राज्यसभा या सभागृहातच करता येतात. त्यासाठी आपल्याला आपले हक्काचे प्रतिनिधी असले पाहिजे असे ते म्हणाले.

## हक्काच्या शासकीय योजनांसाठी भिल्ल वस्तीत जनजागृती

### समाजबांधवांना कागदपत्रे, पात्रता आणि अर्ज प्रक्रियेचे मार्गदर्शन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**श्रीगोंदा :** अनेक शासकीय योजना उपलब्ध असतानाही माहितीच्या अभावामुळे भटके-विमुक्त समाजातील अनेक कुटुंबे आजही योजनांच्या लाभापासून वंचित राहत आहेत. ही दरी कमी करून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शासनाच्या कल्याणकारी योजना पोहोचविण्यासाठी चांडगाव येथील भिल्ल वस्तीत भटके-विमुक्त दिनानिमित्त विशेष जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

अनुगामी लोकराज्य महा अभियान (अनुलोम) आणि जय श्रीराम सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपक्रमात भटके-विमुक्त समाजबांधवांना विविध शासकीय योजनांची माहिती देतानाच त्या योजनांचा प्रत्यक्ष लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे, पात्रतेचे निकष आणि अर्ज प्रक्रियेबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी गणेश पोळ यांनी प्रास्ताविकातून उपक्रमामागील भूमिका स्पष्ट केली. भटके-विमुक्त समाजापर्यंत योजनांची माहिती पोहोचविणे आणि लाभार्थ्यांना प्रत्यक्ष प्रक्रियेत मार्गदर्शन करणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी राम भालसिंग यांनी शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती दिली. भटके-विमुक्त समाजाने शासकीय योजनांकडे केवळ मदत म्हणून न पाहता, आपल्या हक्काच्या संधी म्हणून पाहून त्यांचा लाभ घेण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.यावेळी संभाजी घोडके, सचिन बाबर, नवनाथ शिंदे, दत्तू माळी, रमेश वाघ यांच्यासह भिल्ल वस्तीतील नागरिक आणि भटके-विमुक्त समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमातून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शासनाच्या योजना पोहोचवून त्यांना शिक्षण, रोजगार, सामाजिक सुरक्षा आणि आर्थिक विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

## श्रीक्षेत्र ढोकेश्वर मंदिर परिसराच्या विकासासाठी कटीबद्ध : आ.दाते



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**टाकळी ढोकेश्वर :** श्री क्षेत्र ढोकेश्वर मंदिर परिसर विकासासाठी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन आ.काशिनाथ दाते यांनी केले. पारनेर तालुक्यातील श्री ढोकेश्वर मंदिर येथे महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विकास अंतर्गत ४० लाख रुपयांच्या मंदिर परिसर सुशोभीकरण व भव्य कुस्ती मैदानाच्या लोकार्पणप्रसंगी आ.दाते बोलत होते. यावेळी आ.काशिनाथ दाते यांनी अहिल्यानगर कल्याण महामार्ग ते ढोकी गाव काँक्रिटीकरण व परिसरातील प्रश्न सोडविले जातील तसेच लोकार्पण झालेल्या या कुस्ती स्टेडियमचा पारनेर तालुक्यातील कुस्ती शौकीन व मल्लांना फायदा होणार असल्याचे सांगितले.

यावेळी बाजार समितीचे संचालक बाबासाहेब नऱ्हे यांनी श्रीक्षेत्र ढोकेश्वर मंदिर परिसर व ढोकी परिसरातील विविध प्रश्न मांडले.यावेळी बाबासाहेब नऱ्हे, डॉ प्रदीप दाते,वसंतराव चेडे, प्रशांत गायकवाड,लहानु मोरे,पाटिलबा मोरे, बापू मोरे, कोंडीभाऊ धरम,आप्पासाहेब नऱ्हे,बाजीराव मोरे कलीम पठाण,शिवाजी धरम,रावसाहेब धरम,शिवाजी खटके,बाबाजी नऱ्हे,बाळासाहेब धरम,बापू गोसावी व मान्यवर उपस्थित होते.

## श्री काशीविश्वेश्वर रथोत्सव भक्तिमय वातावरणात संपन्न!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**राशीन :** राशीनच्या ऐतिहासिक आणि श्रद्धेचा वारसा जपणारा श्री काशीविश्वेश्वर रथोत्सव यंदाही मोठ्या उत्साहात, भक्तिमय वातावरणात आणि पारंपरिक दिमाखात संपन्न झाला. शेटे परिवारासह सर्व राशीन ग्रामस्थांनी रथोत्सवाची जबाबदारी सांभाळत शेकडो वर्षांची परंपरा आजही तितक्याच उत्साहाने जपली. रथोत्सवाच्या प्रारंभी विविध देवतांच्या मूर्ती मानकरी कुटुंबीयांच्या डोक्यावरून मंदिरातून रथस्थळी आणण्यात आल्या. श्री काशीविश्वेश्वराची मूर्ती देवगावकर बंधू, भगवान वीरभद्राची मूर्ती नष्टे बंधू, तर श्री गणपती व भगवान विष्णूच्या मूर्ती भागवत बंधू यांच्या डोक्यावरून आणण्यात आल्या. यानंतर यंदाचे रथपूजेचे मानकरी अक्षय शेटे यांच्या हस्ते श्री काशीविश्वेश्वर रथाची विधिवत पूजा करण्यात आली. दुपारी सुमारे दीड वाजता रथाने गावच्या वेशीतून प्रदक्षिणेस सुरुवात केली. चिंचेच्या झाडापासून महात्मा फुले चौक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक, श्री जगदंबा देवी मंदिराच्या पाठीमागून जैन स्थानक, मुख्य बाजारपेठ आणि पुन्हा चिंचेच्या झाडापासून गाववेशीमार्गे रथ शेटे वाड्यासमोर दाखल झाला. याठिकाणी आरतीनंतर रथोत्सवाची सांगता करण्यात आली. रथयात्रेच्या मार्गावर भजन, भारूड, हलगी तसेच विविध पारंपरिक वाद्यांच्या गजराने राशीन परिसर भक्तिमय झाला. भाविकांच्या गर्दीने आणि जयघोषाने संपूर्ण वातावरण दुमदुमून गेले.

## स्व.अजितदादा पवार क्रिकेट स्पर्धेत टाकळी ढोकेश्वर संघ प्रथम



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** पारनेर तालुक्यातील निघोज येथे राष्ट्रवादीच्या जिल्हा कार्याध्यक्षा सुधामती कवाद व मळगंगा प्रतिष्ठानचे अध्यक्ष विठ्ठलराव कवाद यांच्या मार्गदर्शनाखाली राजमाता प्रतिष्ठान यांनी स्व.अजितदादा पवार क्रिकेट करंडक २०२६ ही स्पर्धा भरवली होती.यामध्ये पारनेर , जुन्नर,नगर, आंबेगाव, शिरूर तालुक्यातील १८ संघांनी सहभाग घेतला होता. तीन दिवस चाललेल्या स्पर्धेचे बक्षिस वितरण आमदार काशिनाथ दाते यांच्या हस्ते झाले.यावेळी आमदार काशिनाथ दाते हे म्हणाले,तरुणांनी मोबाईलपेक्षा मैदानी खेळाकडे लक्ष केंद्रित करावे.आपले आरोग्य उत्तम ठेवायचे असेल तर मैदानी खेळ खेळणे महत्त्वाचे आहे.दिवसातुन दोन तीन तास मैदानाबरोबर दोस्ती करा समाधानी राहाल. टाकळी ढोकेश्वर संघाने प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय क्रमांक चासकरवाडी संघ, तृतीय क्रमांक निघोज संघ, चतुर्थ वडझिरे संघ, पाचवा क्रमांक वडनेर संघ व सहावा क्रमांक पुणेवाडी संघाने पटकाविला.

स्पर्धा यशस्वीपणे पार पडण्यासाठी पृथ्वी कवाद, स्वराज कवाद , कृष्णा कवाद, संदीप कवाद, आदेश कोरडे, भास्कर लंके, सचिन लंके, सुजय लाळगे, स्वराज लाळगे , सार्थक राठोड,अजित सोनवणे, संकेत इंगळे, अभि सोनवणे, साई शेटे, बंटी राऊत, साई लाळगे, रुद्र लाळगे, अर्थव लाळगे, श्रीहर्ष कवाद , अथर्व कवाद, नीरज भुकन आदींनी परिश्रम घेतले.

# उपोषणाचा फलक तहसीलवर झळकला; मात्र उपोषणकर्तेच गायब

## मुख्यमंत्री कृषी सौर योजनेला विरोध करण्यासाठी होते उपोषण

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत :** मुख्यमंत्री कृषी सौर योजनेअंतर्गत राशीन ते खेड दरम्यान सुरू असलेल्या वीज वाहिनीच्या कामाला विरोध करत आमरण उपोषणाचा इशारा देणारे उपोषणकर्तेच ऐनवेळी तहसील कार्यालयासमोरून गायब झाल्याने कर्जतच्या प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. उपोषणासाठी शासकीय जागेवर फलक लावण्यात आला. यासाठी पोलीस बंदोबस्तही तैनात करण्यात झाला. मात्र प्रत्यक्षात उपोषणकर्तेच त्या जागी हजर नसल्याचे समोर आले. त्यामुळे 'फलक आहे, पण उपोषणकर्ते गायब असे चिन्ह दिसले.

मुख्यमंत्री कृषी सौर योजनेअंतर्गत राशीन ते खेड अशी सुमारे १३ किलोमीटरची उच्चदाब वीज वाहिनी उभारण्याचे काम सुरू आहे. त्यापैकी सुमारे ११ किलोमीटरचे काम अंतिम टप्प्यात आले असून उर्वरित दोन किलोमीटरचे काम आखोणी शिवारातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दीत सुरू आहे. यासाठी शासकीय स्तरावरून सर्व प्रक्रिया पार देखील पडली. मात्र यास हनुमंत सुळ व इतरांनी विरोध दर्शवत प्रशासनाकडे उपोषणाचा इशारा निवेदनाद्वारे दिला. त्या अनुषंगाने सोमवारी कर्जत तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशाऱ्याचा फलक देखील लावण्यात आला. सकाळी या उपोषणासाठी पोलीस बंदोबस्त तैनात झाला. मात्र वास्तविक स्वरूपात उपोषणाकर्तेच त्या ठिकाणी हजर नव्हते. त्यामुळे प्रशासनाची चांगलीच भंबेरी उडाली. याबाबत उपोषणकर्ते हनुमंत सुळ यांच्याशी संपर्क साधला असता आपण तारखेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आलो आहे.



माझे जोडीदार उपोषणाला बसले असल्याचे त्यांनी प्रशासनास सांगितले. मात्र एक पण कार्यकर्ता त्या ठिकाणी हजर नसल्याने नक्की गडबड काय झाली ? असा सवाल उपस्थित झाला. काम नियमात चालू आहे. रीतसर शासकीय परवानगी घेत त्या ठिकाणी सर्व सोपस्कार पार पाडत असून राशीन ते खेड वीज वाहिनीचे काम पूर्ण झाल्यानंतर भीमा पट्ट्यातील खेड, बाभुळगाव, गणेशवाडी, औटेवाडी, करपडी, शिंपोरा, करमनवाडी, आखोणी आणि वायसेवाडी या गावांतील शेतकऱ्यांना दिवसा आठ तास अखंड वीजपुरवठा मिळण्यास मदत होणार असल्याची माहिती प्रकल्पचे व्यवस्थापक सागर कोल्हे यांनी सांगितले.

> निवेदनाद्वारे उपोषणाचा इशारा दिला. उपोषणाचा फलक देखील लावला मग प्रत्यक्ष उपोषण का झाले नाही याची चर्चा दिवसभर झडली. या प्रकारामागे केवळ आंदोलनाचा हेतू आहे की काही वेगळे दबावतंत्र होते. याचा उलगडा मात्र झाला नाही.

# दैनिक राष्ट्र सह्याद्री




## अयोध्येतील श्रीराम मंदिर ट्रस्टच्या महासचिवपदी स्वामी गोविंद देव गिरी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**बेलापूर** : येथील भूमिपुत्र राष्ट्रसंत स्वामी गोविंद देव गिरी यांची अयोध्या येथील श्रीराम मंदिर ट्रस्टच्या महासचिव पदी सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली. काल अयोध्या येथे श्रीराम मंदिर ट्रस्टच्या बैठकीत नुतन पदाधिका-यांची निवड करण्यात आली. त्यात पुर्वीचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंद देव गिरी यांची महासचिवपदी तर दिल्ली येथील परोपकारी व्यक्तिमत्व असलेले महेश भागचंद यांची कोषाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली.अयोध्येचे माजी लोकप्रतिनिधी मदन मोहन पांडे आणि शिकोहाबाद येथील शिक्षणतज्ज्ञ निर्मला यादव यांची विश्वस्तपदी नियुक्ती झाली आहे. ट्रस्टच्या कारभारात पारदर्शकता आणण्यासाठी माजी एअर मार्शल जितेंद्र मिश्रा यांची ट्रस्टचे प्रथम मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आली. बेलापूरचे भूमिपुत्र तसेच राष्ट्रसंत स्वामी गोविंद देव गिरी यांच्या निवडीचे वृत्त समजताच गावात फटाक्यांची आतिशबाजी तसेच जय श्रीरामच्या घोषणा देत ग्रामस्थ आणि श्रीराम भाविक भक्तांनी आनंदोत्सव साजरा केला.

# रेशनचा गहू काळ्या बाजारात..?

## माळीवाड्यात बोलेरो पिकअपमध्ये १७ क्विंटल सरकारी गहू पकडला

### ५ लाखांचा मुद्देमाल जप्त; रास्तभाव दुकानदारासह दोघांविरुद्ध गुन्हा, दुकान सील

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : सर्वसामान्यांसाठी स्वस्त दरात उपलब्ध करून दिला जाणारा सरकारी रेशनिंगचा गहू काळ्या बाजारात विक्रीसाठी नेण्याचा प्रकार अहिल्यानगर शहरात उघडकीस आला आहे. माळीवाडा परिसरातील बारा तोटी कारंजा येथे अन्नधान्य वितरण व पुरवठा विभाग आणि कोतवाली पोलिसांनी संयुक्त कारवाई करत बोलेरो पिकअपमधून १७ क्विंटल सरकारी रेशनिंगचा गहू जप्त केला.

या कारवाईत वाहनासह तब्बल ५ लाख १ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, रास्तभाव दुकानदार आणि वाहनचालक अशा दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई ३१ ऑगस्ट रोजी रात्री सुमारे आठ वाजता माळीवाडा परिसरातील बारा तोटी कारंजा येथे करण्यात आली. कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे अन्नधान्य वितरण विभागाच्या अधिकारी सपना मनोहर भोवते आणि पोलीस पथकाने संबंधित ठिकाणी छापा टाकला. कारवाईदरम्यान पांढऱ्या रंगाच्या बोलेरो पिकअप गाडीमध्ये प्लास्टिकच्या गोण्यांमध्ये सरकारी रेशनिंगचा गहू भरलेला आढळून आला. सुमारे ५० किलो वजनाच्या ३४ गोण्यांमध्ये एकूण १७ क्विंटल गहू असल्याचे तपासात निष्पन्न झाले. पोलिसांनी पिकअप चालक प्रकाश दत्तात्रय रासकर (रा. सारसनगर) याला ताब्यात घेतले.

चौकशीदरम्यान माळीवाडा परिसरातील रास्तभाव दुकानदार सुरेश बबनराव रासकर यांच्या सांगण्यावरून दुकानातील रेशनिंगचा गहू गोण्यांमध्ये भरून विक्रीसाठी नेत असल्याची माहिती चालकाने दिल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलीस आणि पुरवठा विभागाचे पथक घटनास्थळी पोहोचताच संबंधित दुकानदाराने दुकानातून पलायन केल्याची माहिती समोर आली आहे. त्यानंतर पथकाने रास्तभाव दुकान सील केले असून, पुढील चौकशी सुरू करण्यात आली आहे. ४ लाख ५० हजार रुपयांची बोलेरो पिकअप आणि ५१ हजार रुपये किमतीचा १७ क्विंटल सरकारी रेशनिंगचा गहू, असा एकूण ५ लाख १ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी पिकअप चालक प्रकाश रासकर आणि रास्तभाव दुकानदार सुरेश रासकर यांच्याविरुद्ध आवश्यक वस्तू अधिनियम, १९५५ मधील कलम ३ व ७ अन्वये कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सरकारी धान्याचा काळ्या बाजारात विक्रीसाठी गैरवापर करण्याचा प्रयत्न उघडकीस आल्याने रास्तभाव दुकानांच्या कारभाराबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख करीत आहेत.

## खामगावात शेतकऱ्यांचा गुऱ्हाळघरांना ऊस न देण्याचा निर्धार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**दौंड** : गुळाचा बाजारभाव वाढतो आहे, मग उसाचा दर वाढण्यास अडचण काय ? असा सवाल करत खामगाव येथील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी एकत्र येऊन गुऱ्हाळाला ऊस द्यायचा नाही, एकजूट कायम ठेवा, बाजारभाव निश्चित होईपर्यंत गावातून ऊस बाहेर जाऊ देऊ नका अशी शेतकऱ्यांनी भूमिका घेतली आहे. शेतकऱ्यांच्या उसाला प्रतिटन ४७०० रुपये दर मिळाल्याशिवाय ऊस देणार नाही, असा निर्धार शेतकऱ्यांनी केला.

१ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर पर्यंत गुऱ्हाळाला ऊस न देण्याचा ठराव हात वर करून एकमताने मंजूर केला. दरम्यान खामगाव येथे शेतकरी एकजूट मीटिंगमध्ये सतीश नागवडे, राजाराम खेडेकर, सोपान बर्वे यांनी उसाला अपेक्षित बाजारभाव न दिल्याने चालू उसाची तोड बंद करून १ सप्टेंबर ते १५ सप्टेंबरपर्यंत ऊस न देण्याचा निर्धार केला. बहुतांश गुऱ्हाळांचे जागा मालक हे ऊस पुरवठादार म्हणून काम करतात. ते शेतकऱ्यांकडून कमी भावात ऊस घेऊन परप्रांतीय गुऱ्हाळ चालकास चढ्या दराने विक्री करतात. शेतकऱ्यांच्या असाह्यतेचा वाहतूकदार गैरफायदा घेत असल्याच्या तक्रारीही शेतकऱ्यांनी एल्गार मेळाव्यात केल्या.

## समृद्धी महामार्गावरील लूटप्रकरणाचा तीन दिवसांत छडा

### दिल्ली, नाशिक, बीडपर्यंत पोलिसांची धडक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर** : समृद्धी महामार्गावरील एक्झिट क्रमांक १८ जवळ हडसपिंपळगाव येथे वाहन अडवून चालकाला मारहाण करत गळ्यातील सुमारे दीड लाख रुपये किमतीची सोन्याची चैन लुटणाऱ्या टोळीचा छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांनी अवघ्या तीन दिवसांत छडा लावला. स्थानिक गुन्हे शाखा व वैजापूर पोलिसांच्या पथकांनी दिल्ली, नाशिक आणि बीड येथे कारवाई करत पाच आरोपींना अटक केली. गुन्ह्यात वापरण्यात आलेली काळ्या रंगाची एक्सयूव्ही-७०० कारही पोलिसांनी ताब्यात घेतली. २६ ऑगस्ट रोजी राहुरी येथील फिर्यादी समृद्धी महामार्गावरून प्रवास करत असताना हडसपिंपळगावजवळ आरोपींनी त्यांचे वाहन अडवले. कारची काच खाली करताच आरोपींनी फिर्यादीच्या कानशिलात मारून गळ्यातील सोन्याची चैन हिसकावून पलायन केले. याप्रकरणी वैजापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तपासादरम्यान २९ ऑगस्ट रोजी किरण अजिनाथ गायकवाड याला बीड जिल्ह्यातील रायमोहा येथून ताब्यात घेण्यात आले. त्याच्या चौकशीतून मिळालेल्या माहितीच्या आधारे परशुराम मोहन गायकवाड व करण भरत जाधव यांना दिल्लीतील प्रसादनगर परिसरातून पकडण्यात आले. अनिल जयराम जाधव याला येवला येथून, तर पंडित उर्फ चन्नाअप्पा सखाराम लष्करे याला बीड शहरातून अटक करण्यात आली. पोलिसांच्या माहितीनुसार, परशुराम गायकवाड याच्याविरुद्ध विविध जिल्ह्यांत २० पेक्षा अधिक गुन्हे दाखल आहेत. आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले असून, उर्वरित आरोपी व मुद्देमालाचा शोध सुरू आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक प्रकाश जाधव व अपर पोलिस अधीक्षक प्रशांत स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## दंत उपचार आता रुग्णांच्या दारी

### यशवंतराव चव्हाण दंत महाविद्यालयात 'मोबाइल डेंटल व्हॅन'चा प्रारंभ



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : ग्रामीण तसेच शहरी भागातील नागरिकांना दर्जेदार दंत उपचार सहज उपलब्ध व्हावेत, या उद्देशाने वडगाव गुप्ता येथील यशवंतराव चव्हाण दंत महाविद्यालय व हॉस्पिटलमध्ये विविध अत्याधुनिक सुविधा सुरू करण्यात आल्या. माजी खासदार यशवंतराव गडाख यांच्या प्रेरणेतून बुधवारी ऑर्थोडोंटिक्स व डेंटोफेशियल ऑर्थोपेडिक्स या पदव्युत्तर विभागाचा, अत्याधुनिक 'मोबाइल डेंटल व्हॅन'चा तसेच अहिल्यानगर शहर ते महाविद्यालय अशी मोफत दंत रुग्ण बससेवेचा शुभारंभ करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साई दीप हॉस्पिटलचे डॉ. दीपक एस. एस. होते. उद्योजक नरेंद्र फिरोदिया प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संस्थेचे विश्वस्त व मुळा एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष उदयन गडाख यांनी ग्रामीण व शहरी नागरिकांना आधुनिक दंत उपचार मिळावेत, यासाठी महाविद्यालयाच्या माध्यमातून सुविधा विकसित केल्या जात असल्याचे सांगितले.

महाविद्यालयात सीबीसीटी मशीन, डिजिटल स्कॅनर, दंत रोपणासाठी स्वतंत्र विभाग यांसह अत्याधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. दरमहा ५० हजारांहून अधिक रुग्णांवर उपचार केले जात असल्याची माहिती देण्यात आली. नवीन मोबाइल डेंटल व्हॅनमध्ये दोन डेंटल खुर्च्या, डिजिटल एक्स-रे व आरव्हीजीसह आवश्यक उपकरणे असून, त्याद्वारे थेट गरजू रुग्णांची तपासणी व उपचार करण्यात येणार आहेत. आठवड्यातून दोन वेळा दंत आरोग्य शिबिरे घेण्यात येणार आहेत. ग्रामीण भागासाठी दोन सुसज्ज सॅटेलाईट क्लिनिक सुरू करण्याचाही महाविद्यालयाचा मानस आहे. यावेळी गुणवंत विद्यार्थी व संशोधन करणाऱ्या डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास विविध संस्थांचे पदाधिकारी, प्राध्यापक, डॉक्टर, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नेहल गडाख यांनी आभार मानले.

## गुजर वस्तीवर बिबट्याची दहशत रात्री तीन मेंढरांचा फडशा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**कोपरगाव** : तालुक्यातील चांदेकसारे येथील गुजर वस्तीवर बुधवारी (दि. २) पहाटेच्या सुमारास बिबट्याने हल्ला करून तीन मेंढरांचा फडशा पाडला. कर्नाटक राज्यातून अवघ्या एक दिवसापूर्वी खरेदी करून आणलेल्या मेंढरांवर बिबट्याने हल्ला केल्याने सतीश गुजर यांचे सुमारे ३० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. सतीश गुजर यांनी मंगळवारी (दि.१ सप्टेंबर) कर्नाटक राज्यातून १३ मेंढरांची खरेदी केली होती. व्यवसायात वाढ करण्याच्या उद्देशाने त्यांनी ही मेंढरे घरी आणली. मात्र, दुसऱ्याच दिवशी रात्री सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास बिबट्याने त्यांच्या घराशेजारील सहा फूट उंच कंपाउंडच्या आत असलेल्या मेंढरांवर हल्ला केला. बिबट्याने एका पाठोपाठ तीन मेंढरांना लक्ष्य केले. कंपाउंडवरून उडी मारून त्याने मेंढरांना उसाच्या शेतात ओढत नेले आणि त्यांचा फडशा पाडला. पहाटे सहा वाजता सतीश गुजर व त्यांच्या कुटुंबीयांनी जनावरांना चारा देण्यासाठी उठल्यानंतर हा प्रकार त्यांच्या निदर्शनास आला. कंपाउंड परिसरात सांडलेले रक्त व इतर खुणा आढळून आल्याने त्यांनी आजूबाजूला शोध घेतला असता तीन मेंढरे मृतावस्थेत आढळून आली. गुजर यांनी प्रत्येक मेंढरासाठी सुमारे दहा हजार रुपये मोजले होते. व्यवसाय वाढविण्याच्या उद्देशाने केलेली ही खरेदी अवघ्या एका दिवसात बिबट्याच्या हल्ल्यामुळे नुकसानीत गेल्याने गुजर कुटुंबीयांवर मोठे संकट ओढवले आहे. घटनेची माहिती सतीश गुजर यांनी वनविभागाच्या अधिकारी निकिता पगारे यांना दिली. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी व पंचनामा केला.

## बारामतीच्या भेंडीने परदेशातही पडली भुरळ.....!

नितीन शेळके | राष्ट्र सह्याद्री



**आळेफाटा** : धावपळीच्या नोकरीतून वेळ काढत शेतात काहीतरी वेगळं करण्याची जिद्द आणि त्याला आयुर्वेदाची जोड... याचाच एक आदर्श वस्तुपाठ बारामतीचे आरटीओ अधिकारी आणि शेतकरी विवेक शेळके यांनी घालून दिला आहे. विषमुक्त शेतीचा यशस्वी प्रयोग करत त्यांनी पिकवलेल्या नैसर्गिक भेंडीची चव सध्या केवळ जुन्नर तालुक्यालाच नव्हे, तर सातासमुद्रापार परदेशातील खवय्यांनाही भुरळ घालत आहे. वानेवाडी (ता. बारामती) येथील रहिवासी आणि सध्या पुणे आरटीओमध्ये कार्यरत असलेल्या विवेक शेळके यांची तीन वर्षांपूर्वी बारामती येथे बदली झाली.

नोकरीमुळे एरव्ही दुर्लक्षित राहणाऱ्या आपल्या दीड एकर शेतीत त्यांनी काहीतरी नाविन्यपूर्ण करण्याचे ठरवले. शेतीचा कोणताही पूर्वअनुभव नसताना त्यांनी यूट्यूबच्या माध्यमातून विषमुक्त आणि आयुर्वेदिक शेतीची माहिती घेतली. कोणतीही रासायनिक खते किंवा फवारणी न करता त्यांनी आयुर्वेदिक खतांच्या साहाय्याने प्रथम टोमॅटो, वांगी आणि ढोबळी मिरचीचे उत्पादन घेतले. त्यानंतर वेलवर्गीय भाज्या आणि सध्या भेंडीचे पीक घेतले आहे.

१ महिना टिकणारी 'केमिकल फ्री' भेंडी शेळके यांच्या दीड एकर क्षेत्रातून सध्या रोज १२५ किलो भेंडी निघत असून, तिला तब्बल १२० रुपये प्रति किलो असा प्रीमियम दर मिळत आहे. विशेष म्हणजे ही भेंडी पूर्णपणे नैसर्गिक असल्याने व्यवस्थित ठेवल्यास महिनाभर काळी न पडता टिकून राहते. या भाजीपाल्याचे लॅब टेस्ट रिपोर्ट पूर्णपणे 'झिरो केमिकल' आले असून, त्याला अधिकृत प्रमाणपत्रही मिळाले आहे.

### कुरिअरने घरपोच भेंडी

१६ मे रोजी लागवड केलेल्या या भेंडीतून ९ जुलैपासून उत्पादन सुरू झाले. आतापर्यंत ६ टन भेंडीची विक्री करून शेळके यांनी ५ लाख रुपयांचे उत्पन्न मिळवले आहे. नोव्हेंबरपर्यंत १२ टन उत्पादनातून ७ लाख रुपयांचा निव्वळ नफा मिळण्याचा अंदाज आहे. विशेष म्हणजे ग्राहकांच्या मागणीनुसार ते कुरिअरद्वारे घरपोच भेंडी पाठवत आहेत. आळेफाटा येथील विलास नरवडे यांच्यासह जुन्नर तालुक्यातील अनेक ग्राहकांनी या कुरिअर सेवेचा लाभ घेतला असून, भेंडीच्या उत्कृष्ट चवीचे कौतुक केले आहे.

## 'पाण्याचा प्रत्येक थेंब शेतातच थांबवण्याचा' निर्धार !

### महिलांनी श्रमदानातून उभारला शेतात बंधारा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**झरेकाठी** : 'पाणी आहे तर शेती आहे आणि शेती आहे तर शेतकऱ्याचे भविष्य आहे' हे वास्तव ओळखून पिंपरी निर्मळ येथील सरस्वती महिला शेतकरी गटाच्या महिलांनी जलसंधारणाच्या कामात कौतुकास्पद पुढाकार घेतला आहे. घरची जबाबदारी आणि शेतीची कामे सांभाळत या महिलांनी स्वतः श्रमदान करून शेतात बंधारा उभारला. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या संकल्पनेला कृतीची जोड देत महिलांनी उभारलेला हा बंधारा परिसरातील शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. गटाच्या अध्यक्षा मीनाताई निर्मळ यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांनी हा उपक्रम राबविला.

पावसाचे पाणी वाहून जाऊ न देता ते शेतातच अडवणे, जमिनीत मुरवणे आणि मातीची धूप रोखणे हा या उपक्रमामागील उद्देश आहे. पावसाळ्यात वाहून जाणाऱ्या पाण्याचा वेग बंधाऱ्यामुळे कमी होऊन ते काही काळ शेतात साचते. त्यातून जमिनीत पाणी मुरण्यास मदत होऊन शेतातील ओलावा टिकून राहण्याबरोबरच भूजल पुनर्भरणालाही हातभार लागण्याची अपेक्षा आहे. कमी पावसाच्या पार्श्वभूमीवर या उपक्रमाचे महत्त्व अधिक वाढले आहे. पावसाचा प्रत्येक थेंब मौल्यवान असताना तो शेताबाहेर वाहून जाण्याऐवजी जमिनीत जिरवणे गरजेचे आहे. बंधाऱ्यामुळे पाण्याचा वेग कमी झाल्याने शेतातील सुपीक माती वाहून जाण्याचे प्रमाणही कमी होण्यास मदत होणार आहे. परिणामी जमिनीची सुपीकता आणि पिकांसाठी आवश्यक ओलावा टिकवून ठेवण्यास हातभार लागणार आहे.

याबाबत बोलताना मीनाताई निर्मळ म्हणाल्या, यावर्षी पाऊस कमी आहे. त्यामुळे पडणारे पाणी शेतातून वाहून न जाता आपल्या शेतातच अडले आणि जमिनीत मुरले, तर त्याचा मोठा फायदा शेतीला होईल. विहिरी आणि बोअरची पाणीपातळी वाढण्यास मदत होईल. जमिनीत ओलावा राहिल्याने पिकांना आधार मिळेल आणि उत्पादन घेण्यासही मदत होईल. विशेष म्हणजे, हा उपक्रम केवळ योजनांच्या किंवा चर्चेच्या पातळीवर न ठेवता महिलांनी स्वतः घाम गाळून प्रत्यक्षात आणला आहे. घर, कुटुंब आणि शेतीच्या जबाबदाऱ्या सांभाळत जलसंधारणासाठी श्रमदान करणाऱ्या या महिलांनी 'जलसंवर्धनाची सुरुवात स्वतःच्या शेतापासून' करण्याचा आदर्श घालून दिला आहे. आज अनियमित पाऊस, हवामानातील बदल आणि पाण्याची वाढती टंचाई यामुळे शेतीसमोर मोठी आव्हाने उभी आहेत.

अशा परिस्थितीत केवळ पावसाची प्रतीक्षा न करता उपलब्ध पाणी अडवणे आणि जमिनीत जिरवणे ही काळाची गरज आहे. सरस्वती महिला शेतकरी गटाच्या महिलांनी आपल्या कृतीतून 'पाऊस किती पडला यापेक्षा तो किती जिरवला, हे महत्त्वाचे' असा संदेश दिला आहे. महिलांच्या श्रमातून उभा राहिलेला हा बंधारा केवळ मातीचा बांध नसून शेतीच्या भविष्यासाठीची आशा, पाण्याच्या सुरक्षेची सुरुवात आणि शेतकरी कुटुंबांच्या उद्याचा आधार ठरत आहे.

# श्रीगोंद्यात संशयास्पद कृषी निविष्ठांच्या विक्रीची चर्चा

## कृषी विभागाकडून व्यापक तपासणीची मागणी

दादा सोनवणे | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : तालुक्यात शेतकऱ्यांसाठी विक्री करण्यात येणाऱ्या खते, कीटकनाशके व अन्य कृषी निविष्ठांच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

काही उत्पादनांवर कंपनीचा वैध परवाना, क्यूआर कोड, उत्पादन तारीख, समाप्ती तारीख तसेच उत्पादकाचा स्पष्ट पत्ता उपलब्ध नसल्याची चर्चा शेतकरी वर्गात आहे. त्यामुळे ही उत्पादने अधिकृत आहेत की बनावट, याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित कृषी विभाग व गुणवत्ता नियंत्रण यंत्रणेने तालुक्यातील कृषी सेवा केंद्रांची तसेच संशयास्पद उत्पादनांची व्यापक तपासणी करावी, अशी मागणी होत आहे. आतापर्यंत किती नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले, किती विक्रेत्यांवर कारवाई झाली आणि कोणत्या उत्पादनांवर आक्षेप आढळले, याची माहिती सार्वजनिक करावी, अशीही मागणी आहे.

### कंपन्यांचे नाव व पत्ते बदलत असल्याचा आरोप

काही उत्पादनांच्या कंपन्यांचे नाव, पत्ता अथवा वितरण व्यवस्था वारंवार बदलत असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून केला जात आहे. पुणे, सातारा, कोल्हापूर व सोलापूर जिल्ह्यांतील काही कंपन्यांची उत्पादने तालुक्यात विकली जात असल्याचे सांगितले जाते. काही कंपन्यांचा कृषी सेवा केंद्र चालकांशी संबंध असल्याचीही चर्चा आहे. या सर्व बाबींची अधिकृत पडताळणी होणे आवश्यक आहे.

### किमतीतील मोठ्या फरकाचाही सवाल

काही कृषी उत्पादनांच्या किंमतीबाबतही शेतकऱ्यांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. कमी किमतीच्या घटकांपासून तयार होणारी उत्पादने आकर्षक दावे व मोठ्या जाहिरातींच्या माध्यमातून अनेक पटीने अधिक दराने विकली जात असल्याचा आरोप आहे. अंदाजे ६० रुपयांच्या घटकावर आधारित उत्पादन १२०० रुपये किलो दराने विकले जात असल्याची चर्चा असून, याची सत्यता तपासण्याची मागणी होत आहे.

### खतामुळे तण वाढल्याच्या तक्रारी

काही शेतकऱ्यांनी विशिष्ट कृषी निविष्ठा वापरल्यानंतर शेतात मोठ्या प्रमाणावर लव्हाळा अथवा तण वाढल्याची तक्रार केली आहे. या तक्रारींमध्ये तथ्य आहे की नाही, हे प्रयोगशाळा तपासणीद्वारे स्पष्ट होणे गरजेचे आहे. एका उत्पादनामुळे समस्या निर्माण होऊन त्यानंतर त्यावर नियंत्रणासाठी दुसरे उत्पादन विकले जात असल्यास शेतकऱ्यांवर आर्थिक भार वाढत असल्याचा सवाल उपस्थित होत आहे.

शेतीचा वाढता उत्पादन खर्च पाहता निकृष्ट किंवा बनावट निविष्ठांमुळे नुकसान झाल्यास त्याचा थेट फटका शेतकऱ्यांना बसतो. त्यामुळे तालुक्यातील सर्व संशयास्पद कृषी निविष्ठांचे नमुने घेऊन मान्यताप्राप्त प्रयोगशाळेत तपासणी करावी, कंपन्यांचे परवाने व उत्पादन नोंदणी पडताळावी आणि दोषी आढळल्यास कठोर कारवाई करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

दरम्यान, या सर्व आरोपांची अधिकृत सत्यता तपासणीअंतीच स्पष्ट होणार असून, प्रशासनाने पारदर्शक चौकशी करून शेतकऱ्यांच्या मनातील संभ्रम दूर करण्याची गरज निर्माण झाली आहे.